कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ४ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹

## डॉ. संदीप घोष यांना कोठडी

**नवी दिल्ली :** कोलकातामधील आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलचे माजी प्राचार्य डॉ. संदीप घोष यांना मंगळवारी (दि.३) आठ दिवसांची सीबीआय कोठडीत सुनावण्यात आली. पश्चिम बंगाल राज्य संचालित सुविधेतील आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी सीबीआयने सोमवारी रात्री त्यांना अटक केली होती. सीबीआयने डॉ. संदीप घोष यांच्यासह बिप्लव सिंघा, सुमन हाजरा आणि अफसर अली खान या तिघांनाही अटक केली आहे. कोलकाता येथील विशेष सीबीआय न्यायालयाने मंगळवारी चारही आरोपींना आठ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली. चारही आरोपींना १० सप्टेंबर रोजी पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे.

## मराठवाड्यात पावसाचे थैमान

**मुंबई :** गेल्या तीन दिवसांपासून मराठवाड्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. अतिवृष्टीमुळे वित्त आणि जीवितहानी मोठ्या प्रमाणात झाली आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत पावसामुळे ११ लाख ६७ हजार २७० हेक्टर शेतीवरील पिकांचे नुकसान झाले आहे. दहा जणांचा मृत्यू झाला असून, ५२३ जनावरे दगावली आहेत. जवळपास १२२२ घरांची पडझड झाली आहे. अतिवृष्टीमुळे खरिपाच्या शेतीला मोठा फटका बसला आहे. यात सर्वाधिक नुकसानही नांदेड जिल्ह्यातील झाले असून, ४८ हजार ६७७ बाधित झाले आहेत. या शेतकऱ्यांची तीन लाख ३४ हजार ९८५ हेक्टर जमिनीवरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत.

**आजचा अग्रलेख**
**बुलडोझर रोखला**

**वेधक**

### हेलिकॉप्टर कोसळलं, दोन पायलट बेपत्ता

**नवी दिल्ली :** गुजरातमधील पोरबंदरजवळ अरबी समुद्रात मदतीसाठी गेलेलं भारतीय तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर समुद्रात कोसळलं आहे. या दुर्घटनेनंतर हेलिकॉप्टरचे दोन्ही पायलट व एक डायव्हर बेपत्ता आहे. हेलिकॉप्टरमध्ये चार जण होते. त्यापैकी एकाला बचाव पथकाने वाचवलं आहे. दरम्यान, समुद्रात हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले आहेत. अरबी समुद्रात एक जहाज अडकलं होतं. त्यामुळे जहाजातील कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी तटरक्षक दलाला संदेश पाठवला. तटरक्षक दलाने या जहजावरील लोकांच्या मदतीसाठी हेलिकॉप्टर पाठवलं होतं. या हेलिकॉप्टरमध्ये दोन पायलट व दोन डायव्हर्स होते. मात्र, ते जहाजापर्यंत पोहोचायच्या आधीच समुद्रात कोसळलं.

### आपटेविरुद्ध लूक आऊट नोटीस जारी

**मुंबई :** छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटेविरोधात सिंधुदुर्ग पोलिसांनी लूक आऊट नोटीस जारी केली आहे. मागच्या आठवड्यात मालवण राजकोट येथे उभारण्यात आलेला छ. शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. याप्रकरणी जयदीप आपटे आणि चेतन पाटील या दोघांविरोधात एफआयआर नोंदवण्यात आला आहे. चेतन पाटीलकडे पुतळ्याचा चबुतरा बांधण्याची जबाबदारी होती. त्याला पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. दरम्यान, जयदीप आपटे कल्याणला राहतो. दरम्यान, या घटनेला आठ दिवस झाले, तरी अजून पोलीस त्याला शोधू शकलेले नाहीत. फरार जयदीप आपटेचा थांगपत्ता अद्याप पोलिसांना लागलेला नाही.

# कुंडलिकेतील फुकटच्या पाण्यावर एमआयडीसीचा डोळा

। आविष्कार देसाई ।
। रायगड ।

महाराष्ट्र औद्योगिक कॉरिडोर विकास प्रकल्पांतर्गत रायगड जिल्ह्यातील दिघी पोर्ट औद्योगिक परिसराचा विकास करण्यात येणार आहे. या ठिकाणी बहुतांश खासगी प्रकल्प उभारले जाणार आहेत. भव्य अशा अत्याधुनिक प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज लागणार आहे. कुंडलिका नदीतून वाया (फुकट) जाणाऱ्या पाण्यावर जॅकवेल उभारुन दररोज १२० एमएलडी पाणी उचलण्याचा कुटील डाव एमआयडीसीसह जिल्हा प्रशासनाने आखला आहे. दक्षिण रायगडमधील शेकडो गावे नोव्हेंबर महिन्यापासूनच पाण्यासाठी टाहो फोडतात. त्यांना अशा प्रकारे पाण्याची व्यवस्था करण्याची सूबुद्धी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना का आली नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### जॅकवेल उभारुन जनतेच्या हक्काचे पाणी पळवणार



दक्षिण रायगडमधील टंचाईग्रस्त गावे : ३३१

| रोहा | माणगाव | महाड | पोलादपूर | म्हसळा | श्रीवर्धन | तळा |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 27 | 16 | 105 | 131 | 17 | 21 | 14 |

"दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्रामध्ये माणगाव आणि रोहा तालुक्यातील गावांचा समावेश आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत विकास होणार असून, त्यामध्ये प्रामुख्याने अन्न व प्रक्रिया उद्योग, वस्त्रोद्योग, औषध निर्माण शास्त्र, रासायनिक उद्योग, अभियांत्रिकी उद्योग उभारणार आहे. ३८ हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. तसेच सव्वालाख रोजगार उपलब्ध होणार आहेत. कुंडलिका नदीतून फुकट जाणारे पाणी या प्रकल्पासाठी वापरले जाणार आहे.

– अमरदीसिंग भाटिया, सचिव, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग"

### अधिकाऱ्यांची चिडीचूप

जिल्ह्यात दरवर्षी बेफाम पाऊस पडतो आणि कोट्यवधी लीटर पाणी विविध नद्यांच्या माध्यमातून समुद्राल जाऊन मिळते. आता कंपन्यांना गरज असल्याने कुंडलिका नदीवर जॅकवेल बसवून पाणी उचलण्यात येणार आहे. दक्षिण रायगडमधील शेकडो गावे आणि वाड्यांवर नोव्हेंबरपासूनच पाणीटंचाई निर्माण होते. अशाच प्रकारे जॅकवेल ठिकठिकाणी बसवून ते पाणी नागरिकांना देण्यासाठी एमआयडीसी का प्रयत्न करत नाही, या प्रश्नावर कोणतेच अधिकारी समर्पक उत्तर देऊ शकले नाहीत.

दक्षिण रायगडमधील नागरिकांसह विविध लोकप्रतिनिधींनी एमआयडीसाच्या या भूमिकेला कडाडून विरोध पान २ वर

• (छायाचित्र : समीर मालोदे)




## रायगडात संपाला अल्प प्रतिसाद

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राज्याप्रमाणे वेतन मिळावे यासह अनेक मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी मंगळवारपासून (दि. ३) संप पुकारला आहे. महाराष्ट्र एसटी संयुक्त कृती समितीच्या वतीने हा संप सुरु करण्यात आला आहे. या संपाला रायगड जिल्ह्यातून अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून आले आहे. संपामुळे जिल्ह्यातील काही पान २ वर

"रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, पेण वगळता अन्य आगारांतून उत्तम प्रतिसाद कर्मचाऱ्यांकडून मिळाला आहे. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी हा लढा आहे. त्यामुळे काही जण या संपात सामील झाले नसले, तरीदेखील त्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

– विजय म्हात्रे, कर्मचारी"

### संपात सहभागी नाही

आगरदांडा : मुरुड आगारामधील कर्मचारी या संपात सहभागी नाही. त्यामुळे रोजच्या प्रमाणे एसटी सेवा सुरू राहणार आहे, अशी माहिती मुरुड आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांनी दिली. बससेवा सुरू राहणार असल्याने मुरुडच्या प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

## बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास फाशी

। कोलकाता । वृत्तसंस्था ।

■ पश्चिम बंगाल सरकारचे नवे विधेयक

पश्चिम बंगाल सरकारने महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसंच लैंगिक अत्याचार, शोषण आणि बलात्काराच्या घटनांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने नवं विधेयक आणलं आहे. या विधेयकातली महत्त्वाची तरतूद म्हणजे बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास आरोपीला फाशी दिली जाणार ही आहे. बलात्कार आणि शोषणाच्या घटनांच्या विरोधात हे विधेयक आणण्यात आलं होतं, हे विधेयक ममता सरकारने मंजूर केलं आहे. विधानसभेत हे विधेयक मांडण्यात आलं जे सगळ्याच आमदारांनी एकमुखाने मान्य केलं. अपराजिता वुमन चाईल्ड बिल असं या विधेयकाचं (पश्चिम बंगाल गुन्हेगारी प्रतिबंध कायदा दुरुस्ती विधेयक २०२४) नाव आहे. या विधेयकावर चर्चा करण्यासाठी दोन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलवण्यात आलं आहे. मागच्या महिन्यात ९ तारखेला आर.जी. पान २ वर



## योजना फसली, बहीण रुसली?

। रायगड । खास प्रतिनिधी ।

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा सरकारने राज्यात चांगलाच गाजावाजा केला होता. सुरुवातीला बहिणींच्या खात्यात तीन हजार रुपयांची रक्कम जमा झाली. मात्र, सप्टेंबर महिन्यात नोंदणी करणाऱ्या महिलांना सरकारच्या नियमाचा फटका बसणार आहे. त्यांच्या खात्यात त्याच महिन्याचे पंधराशे रुपये जमा होणार असून, जुलै-ऑगस्ट महिन्यांची रक्कम त्यांना मिळणार नसल्याचे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले आहे. या नियमामुळे राज्यातील कोट्यवधी महिलांचा हिरमोड झाला असून, विरोधकांनी या योजनेवर केलेली टीका आता खरी ठरत असल्याचे दिसत आहे.

### महिलांमध्ये नाराजी

'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेसाठी ज्या महिलांनी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज दाखल केला, त्यांना जुलै आणि ऑगस्ट अशा दोन महिन्यांचा निधी एकत्रित मिळणार आहे. पण, ज्या महिला ही तारीख चुकवतील,१ सप्टेंबरनंतर अर्ज करतील, त्यांना मात्र जुलै आणि ऑगस्टचे पैसे मिळणार नाहीत. त्यामुळे महिलांमध्ये कमालीची नाराजी असून, पुढील कालावधीत याचे विपरीत परिणाम सरकारला भोगावे लागणार असल्याचे बोलले जाते.

■ सरकारच्या नियमाचा कोट्यवधी महिलांना फटका

■ विरोधकांची टीका खरी ठरली

'लाडकी बहीण' योजनेच्या नोंदणीसाठी अर्ज भरण्यास ३१ ऑगस्ट ही शेवटची तारीख नव्हती. त्या तारखेनंतरही ज्या महिला अर्ज भरतील, नावनोंदणी करतील, त्यांना त्या महिन्यापासूनच लाभ मिळेल, असे महिला व बाल कल्याणमंत्री अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे ३१ ऑगस्टनंतरही अर्ज स्वीकारले जाणार आहेत. त्यांना आधीच्या दोन महिन्यांचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे महिलांमध्ये कमालीची नाराजी असून, पुढील कालावधीत याचे विपरीत परिणाम सरकारला पान २ वर




## भावपूर्ण श्रद्धांजली

**एकोणीसावे पुण्यस्मरण**



### मधुसूदन काशिनाथ नाईक

मृत्यू : भाद्रपद शुद्ध प्रतिपदा
४ सप्टेंबर २००५ (तिथीप्रमाणे आज)

**प्रशांत नाईक आणि परिवार**

## जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

। रायगड । खास प्रतिनिधी ।

■ पुरस्कारार्थींमध्ये ११ पुरुष, चार महिला शिक्षकांचा समावेश

■ पेणमधील दिव्यांग शिक्षकाची विशेष पुरस्कारासाठी निवड

जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्राप्त प्रस्तावांमधून समितीमार्फत मूल्यांकन करुन, प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग प्रवर्गातून एका शिक्षकाची विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिली. पुरस्कारार्थींमध्ये ११ पुरुष शिक्षक आणि चार महिला शिक्षकांचा समावेश आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा ५ सप्टेंबर हा जन्म दिवस दरवर्षी शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. जिल्ह्यातून २०२४ च्या पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त प्रस्तावांमधून प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. एका विशेष कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण विविध मान्यवरांच्या हस्ते लवकरच करण्यात येणार आहे.

अलिबाग तालुक्यातील अजित हरवडे यांची जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून, पेण तालुका भास्कर पाटील, पनवेल तालुका जयदास घरत, कर्जत भगवान घरत, खालापूर तालुका राजेंद्र फुलावरे, उरण तालुका सुचिता जोशी, सुधागड तालुका जनार्दन भिलारे, रोहा तालुका लिना सुर्वे, महाड तालुका श्रद्धा मांडवकर, श्रीवर्धन तालुका प्रशांत वाणी, म्हसळा तालुका रमेश जाधव, पोलादपूर तालुका चंद्रकांत उतेकर, माणगाव अपूर्वा जंगम, तळा तालुका अमिष भौड, मुरुड तालुका देवानंद गोगार यांना जिल्हा आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर, पेण तालुक्यातील महेश पाटील यांना दिव्यांग श्रेणीतून विशेष शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे.

## एमआयडीसीला न्यायालयाचा दणका

। अलिबाग । प्रतिनिधी ।

**चार आठवड्यांत उत्तर देणे बंधनकारक**

अलिबाग तालुक्यात शहापूर येथील पेपर मिल कंपनीपर्यंत पोहोच रस्त्यासाठी जमीन मोजणीचा प्रयत्न एमआयडीसी अधिकारी व महसूल अधिकाऱ्यांनी मागील नऊ महिन्यांपूर्वी केला होता. त्याविरोधात शेतकऱ्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने या याचिकेवर सुनावणी देत एमआयडीसीला नोटीस काढली असून, चार आठवड्यांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले असल्याची माहिती अनिल पाटील यांनी दिली आहे. त्यामुळे एमआयडीसीला न्यायालयाने दणका दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

शहापूर येथे विस्तारित औद्योगिक क्षेत्रातील ७६३ हेक्टर या शेतजमिनीवर सरकारने पेपर मिल कंपनीपर्यंत पोहोच रस्ता व्हावा, यासाठी गुरुवार, दि.२३ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी पोलिसांच्या फौजफाट्यासह महसूल व एमआयडीसीचे अधिकारी मोजणीला गेले होते. गावातील शेतकऱ्यांनी या मोजणीला विरोध केला होता. तरीदेखील शिंदे पान २ वर

### घाटगेंच्या हाती 'तुतारी'

**कोल्हापूर :** भाजप नेते समरजित घाटगे यांनी मंगळवारी कागलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात अधिकृतपणे प्रवेश केला. त्यांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम कागलमध्ये पार पडला. पक्षप्रमुख शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत समजित घाटगे यांनी पवार गटाची तुतारी हाती घेतली.

## बाजारात ढोलकी विक्रेते डेरेदाखल; खरेदीला मात्र अल्प प्रतिसाद

# ढोलकीतून घुमतोय गणेशोत्सवाचा नाद

**प्रमोद जाधव**
। अलिबाग ।

गणपती बाप्पाच्या आगमनाचे वेध लागले आहेत. गणरायाच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. गणेशोत्सवात आरती, भजनाला लागणारी ढोलकी बाजारात दाखल झाली आहे. ठिकठिकाणी ढोलकी विक्रत्यांनी दुकाने थाटली आहेत. त्यामुळे बाजारात ढोलकीचा नाद घुमू लागला आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातून ढोलकी विक्रेते अलिबागमध्ये आले असून, गेल्या पंधरा दिवसांपासून वेगवेगळ्या आकाराच्या ढोलकीची दुकाने थाटली आहेत. याठिकाणी ग्राहकांच्या मागणी व पसंतीनुसार ढोलकी उपलब्ध आहे. मात्र, गणरायाचे आगमन चार दिवसांवर येऊनदेखील ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत नसल्याची खंत विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे. परंतु, गणेशोत्सव जसजसा जवळ येईल, तसतशी विक्रीत वाढ होईल, अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली आहे.

गणेशोत्सवात ढोलकी वाद्याला प्रचंड महत्त्व आहे. आरती, भजनांसह पारंपरिक बाल्या नृत्यांसाठी ढोलकीची गरज असते. ढोलकीचा आवाज कानावर पडला की, आपोआप गणेशोत्सवाची चाहूल लागते. गणपतीच्या आरतीवेळी बहुतेक घरातून ढोलकीचा सूर ऐकायला मिळतो. तो कानावर पडला की, आरतीला रंगत येते. दीड दिवसांपासून पाच दिवस, दहा दिवस, २१ दिवस एक जल्लोष साजरा केला जातो. लहान मुलांपासून मोठी मंडळी ढोलकी घेऊन वाजविण्याबरोबरच त्या ठेक्यावर नाचण्याचे काम करतात. गणरायाचे आगमन सात सप्टेंबरला घरोघरी होणार आहे. यानिमित्ताने भजन, आरतीसारखे धार्मिक उपक्रमांसह सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमदेखील राबविले जाणार आहे. वेगवेगळ्या मंडळांसह ग्रामीण भागात ग्रामस्थांच्यावतीनेदेखील कार्यक्रम घेतले जाणार आहे. त्याची तयारी जोरात सुरु आहे.



"ढोलकी विक्रीचा व्यवसाय परंपरागत आहे. वडिलांपासून हा व्यवसाय केला जात आहे. पूर्वी पेणमध्ये दुकान थाटले जात होते. मात्र, गेल्या आठ वर्षांपासून अलिबागमध्ये ढोलकी विक्रीचा व्यवसाय करीत आहे. अद्याप खरेदीला प्रतिसाद मिळाला नाही. परंतु, गणेशोत्सव जसजसा जवळ येईल, तसतशी या विक्रीत वाढ होईल.

– महम्मद शेख, ढोलकी विक्रेते"

त्यामध्ये पारंपरिक वाद्य असलेल्या ढोलकीला देखील पान २ वर



# महामार्गांची खड्ड्यांमुळे चाळण

## प्रवाशांसह वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**गणेशोत्सवाचे आगमन तीन दिवसांवर येऊन ठेपले आहे. चाकरमानी गावी येण्याची लगबग सुरु झाली आहे. मात्र, अलिबाग–पेण, अलिबाग–रोहा मार्गावर मोठमोठ्या खड्ड्यांमुळे प्रवाशांसह चाकरमानी व वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागासह राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**





( छायाचित्र : समीर मालोदे )

रायगड जिल्ह्यात खड्डेमय रस्त्यांमुळे अनेकांना जीव गमवावा लागला असून, काहींना अपंगत्व आले आहे. खड्ड्यांतून प्रवास करणे धोकादायक बनू लागले आहे. गणेशोत्सवापूर्वी खड्डेमुक्त रस्ते होण्याची अपेक्षा होती. परंतु, ती अपेक्षा खोटी ठरणार असल्याचे चित्र आहे. गणरायाचे आगमन येत्या ७ सप्टेंबरला घरोघरी होणार आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी मुंबईतून गावी येणाऱ्या चाकरमान्यांची लगबग सुरु झाली आहे. एसटी बससह खासगी वाहनांमधून प्रवासी प्रवास करीत आहेत. परंतु, अलिबाग-वडखळ मार्गासह अलिबाग-रोहा मार्गावर पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे. अलिबाग-पेण मार्गावरील काही ठिकाणी रस्ता खचला असून, काही ठिकाणी खड्डे पडले आहेत. कार्लेखिंड येथे वळणावर रस्त्याच्या दुतर्फा असलेले कठडे खराब झाले आहेत. अलिबाग-रोहा मार्गावरील पुतबाईचापाडा ते कुंठ्याची गोठी रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहे. येथील रस्त्याचा काही भाग खचल्याने भला मोठा भगदाड पडला आहे. या रस्त्यांची दुरुस्ती तात्पुरता केली जात असली, तरीही खड्डेमय रस्त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. खड्ड्यांमुळे वाहने रस्त्यात बंद पडणे, खड्डे चुकविताना अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

> **गणेशोत्सवापूर्वी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या सूचना दिल्या आहेत. डांबरीकरण आणि काँक्रिटीकरणाच्या माध्यमातून रस्त्यांची डागडुजी करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. रायगडात येणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास खड्डेमुक्त व्हावा यासाठी प्रयत्नशील आहोत.**
> **– जे.ई. सुखदेवे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

# कृषीवलच्या दणक्याने प्रशासनास जाग



## तळा ग्रामीण रुग्णालय येत्या आठ दिवसांत सुरू होणार

## जिल्हा शल्यचिकित्सकांचे लेखी आश्वासन

**। तळा । वार्ताहर ।**

'तळा रुग्णालयाला अद्याप टाळेच' या मथळ्याखाली मंगळवार, दि. ३ ऑगस्ट रोजी कृषीवलने गंभीर प्रश्नाला वाचा फोडल्यानंतर संबंधित जिल्हा आरोग्य यंत्रणेला खडबडून जाग आली. दरम्यान, येत्या आठ दिवसात तळा ग्रामीण रुग्णालय सुरू करण्यात येईल, असे लेखील आश्वासन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी दिले आहेत. याबाबत तळा विकास आघाडीकडून दि. ४ सप्टेंबर रोजी वर्षश्राद्ध आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. यापुढे रुग्णालय प्रशासन नमले आहे. दरम्यान, कृषीवलने आवाज उठविल्याबद्दल सर्व स्तरातून आभार व्यक्त होत आहेत.

तळा तालुका विकास आघाडीने तळा ग्रामीण रुग्णालय सुरू करण्यासंदर्भात घेतलेला पवित्रा दोन वर्षांचे वर्षश्राद्ध घालण्याचं आयोजन ४ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. सदर निवेदनाची दखल ग्रामीण रुग्णालय प्रशासनाने घेतली असून, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी १० कॉट, इमर्जन्सी वॉर्ड सुरू करण्याचे आश्वासन दिले असून, प्रशासनाने ३ वैद्यकीय अधिकारी, २ परिसेविका २ अधिपरिचारिका, २ चतुर्थ श्रेणी कर्मचारी, ५ आयसीयू बेड्स, एक्सरे मशीनरी, संगणक साहित्य व वैद्यकीय साधने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वैद्यकीय अधिकारी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून, ग्रामीण रुग्णालय आठ दिवसांत सुरू करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले असल्यामुळे दि.४ सप्टेंबर रोजी होणारे वर्षश्राद्ध आंदोलन हे तूर्तास मागे घ्यावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

तळा विकास आघाडीने यशस्वी पाठपुरावा केल्यामुळे प्रशासन खडबडून जागे झाले असून, या आंदोलनाची जिल्हा आरोग्य प्रशासनाने दखल घेतली आहे. 'गाव करील ते राव काय करील' या उक्तीप्रमाणे यशस्वी पाठपुरावा केल्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून बंद असलेले ग्रामीण रुग्णालय सुरू होणार आहे.

# गणेशोत्सव आनंदात साजरा करा

## पोलीस उपविभागीय अधिकारी चौधरींचे आवाहन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव हा सण अलिबागमध्ये मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. या सणामध्ये नागरिकांचेही चांगले सहकार्य मिळालेले आहे. यंदाही हा सण आनंदात व शांततेत तसेच नियमांचे पालन करीत साजरा करावा, असे आवाहन अलिबागचे पोलीस उपविभागीय अधिकारी विनीत चौधरी यांनी मंगळवारी केले. दरम्यान, त्यांनी महिला सुरक्षेच्या दृष्टीनेदेखील योग्य पद्धतीने काम करण्याच्या सूचना केल्या.

### प्रांतांची नगरपरिषद प्रशासनाला तंबी

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींनी सूचना मांडल्या. त्यामध्ये फेरीवाले, उनाड जनावरे अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. यावेळी मुख्याधिकारी गैरहजर असल्याने उपविभागीय अधिकारी यांनी नगरपरिषद प्रशासनाला तंबी देत सूचना लिहून घ्याव्या, कार्यवाही न झाल्यास मुख्याधिकारी जबाबदार राहतील, अशी ताकीद दिली.**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अलिबाग व मांडवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शांतता कमिटीची बैठक अलिबाग नगरपरिषदेच्या सभागृहात मंगळवारी (दि. ३) सायंकाळी आयोजित केली होती. या बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना चौधरी बोलत होते. यावेळी अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, मांडव्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक भोई, शेकापचे सुरेश घरत, गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील, नागरिक व शांतता कमिटीचे सदस्य, नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

गणेशोत्सव सात सप्टेंबरपासून ठिकठिकाणी साजरा केला जाणार आहे. गणेशोत्सव साजरा करताना ध्वनी प्रदूषण होणार नाही याची काळजी प्रत्येक मंडळाने घेतली पाहिजे. मिरवणुकीदरम्यान रुग्णालय व इतर सार्वजनिक ठिकाणी बेंजो, डिजेचा आवाज मोठा करून त्यांना त्रास होणार नाही याची दखलही प्रत्येकाने घेणे आवश्यक आहे. नियमांचे पालन करीत हा सण मंगलमय व आनंदमय वातावरणात साजरा करा, असे त्यांनी सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनीदेखील मोलाचे मार्गदर्शन केले. दरम्यान, उपस्थितांनी काही सूचनाही मांडल्या. त्या सूचनांचे पालन योग्य पद्धतीने करून नागरिकांची सुरक्षा राखण्याबरोबरच वाहतूक कोंडी रोखण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन देण्यात आले.

# बोगदा खुला होण्याची शक्यता धूसर

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्याय असणारा घाटातील दुसरा बोगदा ३ सप्टेंबरपूर्वी वाहतुकीस खुला करून चाकरमानी दोन्ही बोगद्यांतून मार्गस्थ होतील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कशेडी बोगद्याच्या पाहणीदरम्यान जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात दुसऱ्या बोगद्याचे काम धीम्या गतीने सुरू आहे. त्यामुळे गणेशोत्सवात दुसरा बोगदा वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता धूसर बनली आहे. महामार्गाचे काम अर्धवट स्थितीत सोडून पळ काढणाऱ्या ठेकाधारक कंपनीवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. राष्ट्रीय महामार्ग खात्याने गणेशोत्सवापूर्वी महामार्गावरील खड्डे बुजवत गणेशभक्तांचा प्रवास सुखकर करण्यासाठी कंबर कसली आहे. खड्डे बुजवण्यासाठी चार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे निर्देशदेखील देण्यात आले आहेत. त्यानुसार युद्धपातळीवर खड्डे बुजवून मार्ग सुस्थितीत आणण्याचे काम सुरू आहे. चाकरमान्यांसाठी ही समाधानकारक बाब असली तरी बुजवलेले खड्डे कितपत तग धरतील, हादेखील प्रश्नच आहे.

# भाजपची संघासमोर शरणागती

## ✻ विधानसभा रणनीतीच्या प्रत्येक बैठकीत सहभाग
## ✻ मुंबईतील ३६ मतदारसंघांसाठी महत्त्वाचा निर्णय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत मुंबईत ३ पैकी २ हातच्या जागा गमावल्यानंतर भाजपनं संघासमोर शरणागती पत्करली. येत्या निवडणुकीत पूर्ण मदत करण्याचे आश्वासन देताना संघाने भाजपच्या प्रत्येक स्तरावर हस्तक्षेप करण्याची अट घातली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्नित असलेल्या विश्व हिंदू परिषद, वनवासी कल्याण आश्रम आणि अशा सर्व आघाड्या आता महायुतीच्या उमेदवारांसाठी छुप्या व उघड पद्धतीनं काम करणार आहेत.

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अपेक्षित मदत न केल्यामुळे भाजपला मोठा फटका बसला होता. मुंबईसह राज्यभरात याचा प्रभाव जाणवला होता. त्यामुळे भाजपच्या लोकसभेच्या जागांची संख्या २३ वरुन ९ पर्यंत खाली घसरली होती. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या रणनीतीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांना सामील करुन घेतले जाईल.

विधानसभा निवडणुकीसाठी संघाचे कार्यकर्ते सक्रिय झाले आहेत. मुंबईतील ३६ मतदारसंघांमध्ये भाजपवर संघाची करडी नजर राहणार आहे. संघाच्या हिंदुत्वाच्या अजेंड्यावरच भाजप मुंबईत लढेल, असे पक्षांतर्गत सूत्रांकडून सांगितले जात आहे. लोकसभेला संघाने पाठ फिरवल्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रात भाजपची पिछेहाट झाली होती. मात्र, आता संघ विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी भाजपसोबत मैदानात उतरणार आहे. मुंबईत यामिनी जाधव यांना दिलेल्या उमेदवारीमुळे संघात कमालीची नाराजी होती. लोकसभा निवडणुकीत संघाने याच नाराजीमुळे तटस्थ राहण्याचा निर्णय घेतल्यानं महायुतीला मुंबईत अवघ्या २ जागांवर समाधान मानावे लागले.

उमेदवार निवडीमध्ये संघ कुठलाही हस्तक्षेप करणार नाही. मात्र, त्याचवेळी अजेंडा राबवताना कुठलीही तडजोड केली जाणार नाही, याचीही खात्री संघाने भाजपला दिल्याचे सूत्रांचं म्हणणं आहे.

# तालुक्यातील सात ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त



## सरपंच आणि ग्रामसेवक यांचा गौरव

**। कर्जत । प्रतिनिधी।**

कर्जत तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत क्षयरोगमुक्त करण्याचा निर्धार तालुकास्तरीय टीबी फोरमच्या बैठकीत करण्यात आला होता.

क्षयरोग पथक कर्जत अंतर्गत पंचायत समितीच्या सभागृहात क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत गौरव पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव, अतिरिक्त गटविकास अधिकारी प्रभाकर बोरकर उपस्थित होते.

तालुक्यातील हुमगाव, कोंदिवडे, नांदगाव, आंबेरपडा, जिते, वरई, दहिवली वरेडी या सात ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त झाल्या आहेत. या सातही ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक यांना राष्ट्रपती महात्मा गांधी स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. सदर कार्यक्रमास तालुक्यातील आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा कर्मचारी उपस्थित होत्या. वरील कार्यक्रमांचे आयोजन सुनील चव्हाण, गजेंद्र महाजन, नितीन पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन रवींद्र माने यांनी केले.

**जाहीर नोटीस** दि. ०३/०९/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे गुंडगे, ता. कर्जत जि. रायगड येथील

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| ६३ | १ | ४-७६-६० | ९-६० |

ची बिनशेती जमीन मिळकत विद्यमान मालक यांच कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त बिनशेती जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्तखत, खरेदीखत वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त बिनशेती जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त बिनशेती जमीन मिळकतो संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

# पान १ वरून

## एमआयडीसीचा डोळा

करणे गरजेचे आहे. होऊ घातलेल्या पंचतारांकीत उद्योगांचाच विकास न करता रोहा आणि माणगाव तालुक्यातील प्रत्येक गावातील नागरिकांचा उत्कर्ष आणि विकास होणे गरजेचे आहे. त्यांना त्यांच्या हक्काचे पाणी देणे गरजेचे आहे.

नजीकच्या कालावधीत रायगड जिल्ह्याचा कायापालट होणार आहे. जिल्ह्याला विकासाच्या दृष्टीने समृद्ध करण्याचा विडा केंद्र आणि राज्य सरकारने उचलला आहे. देशातील १२ स्मार्ट सिटी विकसित करण्यात येत आहेत. त्यामध्ये जिल्ह्यातील दिघी बंदराचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. एकूण सहा हजार ५६ एकर इतक्या क्षेत्रात विविध प्रकल्प विकसित केले जाणार आहेत. त्यामध्ये खासगी तसेच सरकारी उद्योग उभारले जाणार असून, ४० टक्के भागात वसाहत आणि ६० टक्क्यांमध्ये औद्योगिक क्षेत्र उभारले जाणार आहे. मोठ्या संख्येने प्रकल्प उभारण्यात येणार असल्याने त्यांना पाण्याची आवश्यकता लागणारच आहे. यासाठी लागणारे पाणी कोठून उपलब्ध करणार असे विचारले असता उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचे सचिव अमरदीपसिंग भाटिया यांनी सांगितले की, कुंडलिका नदीचे लाखो लीटर पाणी दररोज वाया (फुकट) जाऊन समुद्राला मिळते. त्या पाण्यावर जॅकवेल उभारुन दररोज १२० एमएलडी पाणी उचलण्यात येणार आहे. याचाच अर्थ, एमआयडीसीचा कुंडलिका नदीच्या फुकटच्या पाण्यावर डोळा असल्याचे उघड झाले आहे.

उद्योग, व्यवसाय उभारताना पाण्याची गरज लागणारच आहे. विकासाला कोणाचाच विरोध असण्याचे कारण नाही. मात्र, स्थानिक जनतेच्या हिश्श्याच्या पाण्यावर डल्ला मारुन निर्माण होणाऱ्या उद्योगांकडे ते पाणी वळवण्याचा कुटील डाव एमआयाडीसीचा आहे.

## बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास फाशी

कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय या ठिकाणी एका डॉक्टर महिलेवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. या घटनेने सगळा देश हादरला. या प्रकरणानंतर आता कायदे कठोर करण्याच्या दृष्टीने ममता सरकारने हे नवं विधेयक आणलं ज्या विधेयकाला आता मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे या विधेयकाचं कायद्यात रुपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## लालपरीला ब्रेक

आगारातील फेऱ्या बंद झाल्याने ऐन गणेशोत्सवात प्रवाशांचे हाल झाल्याची माहिती समोर येत आहे.

एसटी कर्मचारी गेल्या अनेक महिन्यांपासून त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी लढा देत आहेत. वारंवार वरिष्ठ पातळीवर बैठका घेण्यात आल्या. परंतु, प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नसल्याने महाराष्ट्र एसटी संयुक्त कृती समितीच्या वतीने संपाची हाक देण्यात आली. ऐन गणेशोत्सवाच्या हंगामात कर्मचाऱ्यांच्या संपाचा फटका जिल्ह्यातील काही प्रवाशांना बसला. जिल्ह्यात या संपाला ४० टक्के प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती समोर येत आहे. जिल्ह्यातील अलिबागसह अनेक आगारांतील एसटी बस फेऱ्या कर्मचाऱ्यांविना बंद करण्याची वेळ प्रशासनावर आली. गणेशोत्सवामध्ये मुंबईतून गावी येणारे व गावावरून मुंबई, पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे. गेल्या अनेक दिवसांपासून एसटीतून प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. परंतु, कर्मचाऱ्यांच्या संपामुळे काही फेऱ्या रद्द कराव्या लागल्याची माहिती विभागीय कार्यालयाकडून देण्यात आली.

## योजना फसली, बहीण रुसली?

भोगावे लागणार असल्याचे बोलले जाते.

सरकारने १ जुलैपासून राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना लागू केली. या योजनेसाठी राज्यभरातून २ कोटी ४० लाख महिलांचे अर्ज आले. या योजनेचा पहिला आणि दुसरा हप्ता सरकारने ऑगस्टमध्ये जमा केला. त्यामुळे लाभार्थी महिलांना एकत्रित तीन हजार रुपये मिळाले. सरकारने १७ ऑगस्टपासून महिलांच्या खात्यात पैसे जमा करण्यास सुरूवात केली असून, आतापर्यंत दीड कोटी महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. आधार कार्ड हे बँक खात्याशी लिंक नसल्याने काहींचे पैसे जमा झालेले नाहीत. आधार लिंक झाल्यानंतर पैसे जमा केले जाणार आहेत.

या योजनेवर सरकारच्या तिजोरीवर हजारो कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. आधीच वित्तीय तूट वाढत असल्याने अशा योजना अंमलात आणणे धाडसाचे ठरणार होते. यासाठीच अर्थ व नियोजन विभागाने यावर आक्षेप घेतला होता. परंतु, आगामी विधानसभेच्या निवडणुकीत शिंदे-फडणवीस-पवार यांच्या सरकारला फायदा उचलायचा होता. यासाठी महिलांना आमिष दाखवत असल्याची टीका विरोधकांनी केली होती.

## एमआयडीसीला न्यायालयाचा दणका

सरकारच्या दबावाखाली जाऊन महसूल व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी मोजणी सुरुच ठेवली होती. त्यावेळी शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून पोलिसांसह महसूल व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

शेतातून गेले नाहीत तर शेकाप स्टाईलने आक्रमक होऊ, असा इशारा दिला होता. शेकापच्या ठाम भूमिकेबरोबरच शेतकऱ्यांच्या एकजुटीमुळे तेथील अधिकाऱ्यांना मोजणी न करताच पळ काढावा लागला.

शासन व प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात शेतकरी संघर्ष समिती पेझारी आणि ग्रामसुधार चॅरिटेबल ट्रस्ट धाकटे शहापूर यांनी न्यायालयात धाव घेतली. विस्तारित दुसऱ्या टप्प्यातील एमआयडीसी प्रकल्प व पोहोच रस्त्याच्या सक्तीच्या भूसंपादनासंदर्भात मुंबई न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. त्याबाबत न्यायाधीश ए.एस. चांदोरकर व न्यायाधीश राजेश एस. पाटील यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे वकील ॲड. मंदार सोमण व ॲड. आव्हाड यांनी न्यायालयात बाजू मांडताना सांगितले, सदरील जमिनीची मोजणी करताना शेतकऱ्यांना नोटीस न पाठवता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनयम १९६६ चे कलम ८० व ८१ चे उल्लंघन केले आहे.

एमआयडीसी व शासनाच्या मोजणी अधिकाऱ्यांनी २३ नोहेंबर रोजी पोलीस बळाचा वापर करून सक्तीने जमिनीची अतितातडीची मोजणी करण्यासाठी आले होते. भूसंपादन करताना भूसंपादन कायदा २०१३ कलम २६ ते ३० प्रमाणे जमिनीच्या मोबदल्याची परिगणती केली जात नाही, हे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर न्यायालयाने एमआयडीसी महाराष्ट्र शासनास नोटीस काढली असून, चार आठवड्यांच्या आत उत्तर देण्यास सांगितले आहे. तोपर्यंत जमिनीची भूसंपादन प्रक्रिया करता येणार नाही, असे न्यायालयाने त्यांना सांगितल्याची माहिती सचिव अनिल पाटील यांनी दिली. त्यावेळी न्यायालयात शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रकाश धुमाळ, उपाध्यक्ष अंबरनाथ पाटील व सचिव अनिल पाटील उपस्थित होते.

## ढोलकीतून घुमतोय गणेशोत्सवाचा नाद

मागणी अधिक असते. त्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील पेण, रोहा अशा अनेक बाजारात ढोलकीची दुकाने सजली आहे. अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने या ठिकाणीदेखील ढोलकी विक्रीची दुकाने थाटण्यात आली आहेत.

अलिबागमध्ये गेल्या आठ वर्षांपासून लखनऊ येथील ढोलकी विक्रेते येतात. यंदाही ते ढोलकी विक्रीसाठी दाखल झाले आहेत. ग्राहकांच्या पसंती व मागणीनुसार ढोलकी तयार करून दिली जात आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून दुकाने सजली असली, तरीसुद्धा खरेदीला अल्प प्रतिसाद असल्याचे विक्रेते शेख यांनी सांगितले आहे. मागील वर्षी ७०हून अधिक ढोलक्यांची विक्री झाली होती. आधुनिक युगात ढोलकीला या कालावधीत मागणी आहे. परंतु, यंदा पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. गणेशोत्सवाच्या दोन दिवस अगोदर खरेदीला गर्दी होण्याची शक्यता आहे. लहान ढोलकीपासून मोठ्या आकाराच्या ढोलकी बाजारात दाखल असून, दोनशे रुपयांपासून साडेतीन हजार रुपयांपर्यंत ढोलकी विक्रीसाठी ठेवल्या आहेत, असे ढोलकी विक्रेत्याने सांगितले.

**जाहीर सूचना**
**नोंदणीकरण पावती गहाळ**

झाल्यासंदर्भात सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, मी, श्री. ऋषीन अश्विन सावनी माझे फ्लॅट क्र. बी - ७०७, नरेंद्र पार्क सीएचएस, सीएस रोड, आनंद नगर, दहिसर (पू.), मुंबई - ४०० ०६८ या जागेसंदर्भातील विक्री करार दि. १५.०३.१९९५संदर्भातील मूळ नोंदणीकरण पावती हरवली आहे. मी दहिसर पोलीस स्टेशन येथे एफआयआरसुद्धा (एफआयआर नं. २०२९/२४) दाखल केली आहे.
कोणाही व्यक्तीकडे वरील दस्तावेजांचा ताबाअसल्यास कृपया मला खालील पत्त्यावरसंपर्क साधावा.
एफ/४, १ ला मजला, भाग्योदय सीएचएस, सिक्का नगर, व्हीपी रोड, मुंबई - ४०० ००४.
दि. ०३.०९.२०२४

सिडको
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व **१) महेंद्र रामचंद्र देशमुख, २) श्याम रामचंद्र देशमुख ३) मंगळ विश्वनाथ देशमुख ४) प्रितेश विश्वनाथ देशमुख, राहणार – गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड** ------- (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. निळकंठ इंटरप्रायजेस तर्फे भागीदार **१) श्री. राहुल दिनेश पटेल २) श्री. गिरीश धनजी पटेल** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २३१५ | २१.०८.२०२४ | पुष्पक नोड | २६ | ८४ | ६९० चौ.मी. पैकी ३४५ चौ.मी. | १५.०७.२०२४ | २२.०७.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसाच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२०७/२०२४-२५

**निवडक**

## वंशावळ स्मरणिकेचे प्रकाशन

**माणगाव :** हरदास वळी तरुण मंडळ माणगाव यांच्या माध्यमांतून लोककलाकारांच्या कला घराण्याचा आढावा घेणारी तसेच त्यांचे महत्व अधोरेखित करणाऱ्या वंशावळ स्मरणिकेचे प्रकाशन कुणबी भवन हॉल माणगाव येथे करण्यात आले. या कार्यक्रमास महादेवराव बक्कम, रामभाऊ टेंबे, सचिन माळी, सहादेव बक्कम, सखाराम गुगळे, नथुराम पाष्टे, शंकर फणसे, अंकुश जाधव, शंकर तुरडे, वसंत भोईर, रमेश शिर्के, परशुराम खानविलकर, दगडू तोंडलेकर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रा. सूर्यवंशी यांचा सन्मान

**महाड :** प्रा. संभाजीराव सूर्यवंशी यांना पुणे येथील एस फोर सोल्युशन्स या संस्थेच्या वतीने आध्यात्मिक लेखन स्पर्धा २०२४ ने गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या सहकारी बँकेचे संचालक डॉ. बेंगाळे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून स्वप्नील पोरे, शामला दीदी, प्रा. मिलन मेत्रे, सुनील नाईक, किरण भिसे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. एस फोर सोल्युशन्सचे मुख्य प्रवर्तक शैलेश कुलकर्णी. सन्मान पत्राचे वाचन प्रशांत अनासपुरे यांनी केले.

## जाधव दाम्पत्यांचा गौरव

**पाताळगंगा :** शिक्षण आणि सामाजिक कार्यामध्ये अमुल्य योगदान असलेल्या व्यक्तींचा जागतिक संविधान आणि संसद असोसिएशन यांचे जागतिक मुख्यालय अमेरिका येथे असून ही संस्था उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करीत असते. खालापूर तालुक्यातील राजिप शाळा वडवळ येथिल शिक्षक राजाराम जाधव व त्यांच्या पत्नी रेखा जाधव राजिप शाळा माजगांव येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. या उभयंतास जागतिक संसद इंटरनॅशनल अवॉर्ड म्हणून श्रीरामपूर येथे सन्मानित करण्यात आले.

## नामफलक अनावरण कार्यक्रम

**उरण :** केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांच्या संकल्पातून पेण तालुक्यातील दुरशेत गावात आम्ही दुरशेतकर या नावाचे विद्युत रोषणाईने चमकणारे नूतन नामफलक देण्यात आले. नूतन नामफलकाच्या अनावरण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने दुरशेत गावात करण्यात आले. या सोहळ्याप्रसंगी राजू मुंबईकर, स्नेहल पालकर, सुरेंद्र पाटील, महेश घरत, सूरज भोईर, शरद गावंड, नंदिनी गावंड, भाग्यश्री गावंड आदी उपस्थित होते.

## शालेय वस्तुंचे वाटप

**खोपोली :** जी.जी.वेलफेअर सोसायटीच्या माध्यमातून राज्यभर सामाजिक उपक्रम राबवत असतानाच खोपोली नगरपरिषदेची मीळगांव आदिवासी वाडीतील शाळा क्र.१७ मधील इयत्ता १ ली ते ३ री वर्गातील एकूण ५० विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप आणि शाळेच्या आवारात वृक्ष लागवड करण्यात आली. याप्रसंगी महेश वाघमारे, अमित वाळवे, अमोर वळसंग, कमाल पाटील, महमंद पठाण, दाऊद शेख, राशिद कर्जिकर, मुख्याध्यापक अनिल भोवर उपस्थित होते.

**मेढेखार येथे कागदी लगद्यापासून हजारो गणेशमूर्ती**

# ईकोफ्रेंडली गणेशमूर्तींना विदेशात मागणी

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**वाढत्या प्रदुषणाला रोखण्यासाठी अलिबाग तालुक्यातील बांधण येथील कौस्तुभ पाटील यांनी पर्यावरण पुरक अशा इको फ्रेंडली गणेशमूर्ती तयार करण्यावर भर दिला आहे. कागदी लगद्यापासून हजारो गणेशमूर्ती तयार करण्यात आली असून या मूर्तींना लंडन, कॅनडा, अमेरिका सारख्या देशात प्रचंड मागणी आहे. एक हजारहून अधिक गणेशमूर्ती विदेशात पाठविण्यात आल्या आहेत.**





कौस्तुभ पाटील बी. ई. मॅकेनिकल आहेत. त्यांनी पर्यावरणपुरक गणेशमूर्ती तयार करण्याची संकल्पना सहा वर्षापूर्वी मनात आणली. स्वतःमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आपल्या शिक्षणाचा वापर करीत पर्यावरणाचे महत्व यातून पटवून देण्याचाही त्यांनी प्रयत्न केला.

वेगवेगळ्या वृत्तपत्रांपासून त्यांनी गणेशमूर्ती तयार करण्यास सुरुवात केली. दीड फुटापासून पाच फुटांपर्यंतच्या दीड हजारहून अधिक गणेशमूर्ती त्यांच्या मार्फत तयार करण्यात आल्या आहेत. दोन फुटाची एक मूर्ती तयार करण्यासाठी साधारणतः कागद, इतर साहित्यांसह सहा किलो वजनाचे मटेरिअल लागते. एक हजार रुपयांपासून साडेतीन हजार रुपयांपर्यंत किंमत असून मूर्ती तयार करण्यासाठी वर्षाला सुमारे एक टनाहून अधिक वृत्तपत्राची गरज निर्माण होते.

दुबई, कॅनडा, लंडन, अमेरिका सारख्या देशांमध्ये या मूर्तींना मागणी अधिक आहे. या व्यवसायातून परिसरातील पंधराहून अधिक महिलांना वर्षभर रोजगाराचे साधन खुले झाले आहे. अनेक महिलांच्या हाताला काम मिळाले आहे. वजनाने हलकी व विसर्जनासाठी सोयीस्कर अशा मूर्ती या ठिकाणी तयार होत असल्याने स्थानिक बाजारातदेखील मागणी असल्याचे कौस्तुभ पाटील यांनी सांगितले आहे.

# माणगावात पोलिसांचे दंगा काबू प्रात्यक्षिक

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

आगामी काळात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सव व नवरात्र उत्सव सणाच्या अनुषंगाने माणगावचे उपविभागीय पोलिस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव शहरांमध्ये पोलीस ठाणे येथून कचेरी रोड-मोर्बा नाका-माणगाव बाजारपेठ मुंबई-गोवा महामार्गाने एसटी स्थानकापर्यंत रूटमार्च काढण्यात आला. त्यानंतर



माणगाव बस स्थानक आवारात दंगा काबू योजना प्रात्यक्षिक घेण्यात आले. या प्रात्यक्षिकाला २ अधिकारी व २२ पोलीस अंमलदार व माणगाव आर.सी.पी.प्लाटून ३० अंमलदार उपस्थित होते.

गणेशोत्सव, उत्सव व नवरात्रोउत्सव काही दिवसावर येवून ठेपला असताना माणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून माणगाव पोलिसांनी शांतता समितीच्या बैठका घेतल्या. त्यानंतर लागलीच माणगाव विभागातील पोलीस दक्ष झाले असून माणगाव पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी माणगाव बाजारपेठेतून रूट मार्च काढीत दंगा काबू प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या उपस्थितीत घेण्यात आले. त्यानंतर रंगीत तालमीची सांगता करण्यात आली.

# गाडीचा धक्का लागल्याने लाकडी बांबूने केली मारहाण

**नवीन पनवेल :** कारला विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या बसचा धक्का लागल्याने कारचालकाने शिवीगाळ करत लाकडी बांबूने बस चालकाला मारहाण केली. यात बस चालक जखमी झाला आहे.

सुधीर मोरे हे बसमध्ये सेंट जोसेफ नवीन पनवेल येथील विद्यार्थी बसमध्ये घेऊन त्यांना घराजवळ कामोठे परिसरात सोडण्यासाठी निघाले. बस विद्यार्थ्यांसह किया शोरूम जवळ आली असता कारच्या चालकाने त्याच्या ताब्यातील कार उजव्या बाजूला घेतल्याने बसचा पुढील भाग त्याच्या कारच्या मागील बाजूला घासला गेला. यावेळी कारचालक शिवीगाळ करत धमकी देऊ लागला. बस चालक काम ठेकडे जाण्यासाठी निघाले असता कार चालकाने पाठलाग केला आणि बस विद्यार्थिनीला सोडण्यासाठी थांबवली असता त्याने कार बसच्या समोर थांबवली आणि लाकडी बांबूने मारण्यासाठी गाडीच्या दिशेने धावत आला. सुधीर मोरे यांना गाडी बाहेर खेचून त्यांना लाकडी बांबूने मारहाण केली. यात सुधीर मोरे जखमी झाले. यावेळी मोरे यांची मुलगी मदतीसाठी धावून आली असता कारचालक तेथून पळून गेला.

## हरी म्हस्कर यांचे निधन

**धाटाव :** धाटाव येथील ज्येष्ठ नागरिक हरी सहदेव म्हस्कर यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी राहत्या निवासस्थानी नुकतेच निधन झाले. त्यांच्या अंत्ययात्रेसमयी प्रचंड



जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अनेकांनी शोक व्यक्त केला. गावासह लगतच्या परिसरात त्यांचा मोठा मित्र परिवार होता. त्यांच्या अंत्ययात्रेला विविध स्थरातील मान्यवरांसह धाटाव ग्रामस्थ,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हरी म्हस्कर यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली, सूना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे.त्यांचे दशक्रिया विधी बुधवारी (दि.४) तर धार्मिक उत्तरकार्य विधी गुरूवारी (दि.५) त्यांच्या निवासस्थानी करण्यात येणार आहेत.

**मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान**

# पालीत राजिप विभागातून तिवरे शाळा प्रथम

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात सुधागड तालुक्यात रायगड जिल्हा परिषद विभागातून तिवरे तर खाजगी अनुदानित विभागातून श्री राज एज्युकेशन सेंटर घोटवडे शाळेस तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे.

ही स्पर्धा जिल्हा परिषद शाळा व खासगी अनुदानित शाळा अशा दोन विभागात घेण्यात आली.

तालुक्यातील शाळांची तपासणी तालुकास्तरीय मूल्यमापन समितीने प्रत्येक उपक्रम निहाय करून मूल्यांकन केले. त्यामध्ये रायगड जिल्हा परिषद विभागातून तिवरे शाळेने बाजी मारून सुधागड तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. तर द्वितीय क्रमांक सिद्धेश्वर बुद्रुक तर तृतीय क्रमांक सागवाडी ही शाळा ठरली.खासगी अनुदानित शाळा विभागातून श्री राज एज्युकेशन सेंटर घोटवडे प्रथम , अनुदानित आश्रमशाळा वावळोली द्वितीय तर आत्मोन्नती विद्यामंदिर जांभूळपाडा तृतीय क्रमांक मुख्यमंत्री माझी शाळा सूंदर शाळा टप्पा २ या उपक्रमात पात्र ठरल्या.

# कशेडीतील भुयारी मार्गामध्ये स्कूटर घसरल्याने अपघात

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गातील रस्ता चिखलमय आणि निसरडा झाल्याने बोगद्यात दुचाकी घसरून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. रविवारी दुपारी झालेल्या या अपघातानंतर एकाच भुयारी मार्गातून दुहेरी वाहतूक सुरू झाल्यानंतर दुचाकीचा अपघात होण्याची तिसरी घटना झाल्याचे कातळी भोगाव येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

दुचाकीस्वार भानुदास लक्ष्मण कारभळ हा आपल्या ताब्यातील ॲक्टिवा दुचाकी घेऊन कापूरघोळ ते खेड असे जात असताना कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गामध्ये आला. यावेळी गळणाऱ्या भुयारी मार्गामुळे काँक्रीटचा रस्ता निसरडा होऊन त्यावरून स्कूटर घसरल्याने दुचाकीस्वार भुयारीमार्गाच्या कठड्यावर आपटून गंभीररित्या जखमी झाला.

अपघाताची माहिती समजताच, कशेडी महामार्ग पोलीस मदत केंद्राचे सहाय्यक पोलीस निरीक्षक समेळ सुर्वे, सहाय्यक फौजदार सचिन सावंत, पोलीस हवालदार शंकर कुंभार, गजानन रामागडे, संजय चिकणे यांच्यासह पोलादपूर पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार बामणे यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी दुचाकीस्वारास पोलादपूर ग्रामीण रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी दुचाकीस्वार भानुदास कारभळ याच्या डोक्याला गंभीर स्वरूपाची इजा झाल्याने त्याच्यावर पुढील उपचार करण्यासाठी त्याला डेरवण येथील श्रीसद्‌गुरू दिगंबरदास चॅरिटेबल ट्रस्टच्या रूग्णालयामध्ये हलविण्यात आले.

## महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण

**पाली :** शेठ ज.नौ.पालीवाला महाविद्यालय, पाली-सुधागड,ती सेवा योजना कक्षाच्या माध्यमातून महाविद्यालय तसेच दत्तक गाव भार्जे, सिद्धेश्वर व नाडसूर या ठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. दिवसेंदिवस होणारा ऱ्हास रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षलागवड करणे गरजेचे आहे, याच उद्देशाने वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालय परिसरात प्राचार्य डॉ.सुधाकर लहुपचांग यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सर्जेराव पाटील, डॉ.अनिल झेंडे आदी उपस्थित होते.

# भावी पोलिसांना निकालाची प्रतीक्षा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड पोलीस दलातील पोलीस शिपाई, बॅन्डमन, चालक या पदासाठी मैदानी चाचणी झाली. मागील महिन्यात लेखी परिक्षादेखील घेण्यात आली. मात्र अनेक दिवस उलटूनही या परिक्षेचा निकाल अद्याप जाहीर झाला नाही. त्यामुळे भावी पोलिसांना पोलीस भरतीच्या निकालाची प्रतिक्षा लागून राहिली आहे.



रायगड पोलीस दलातील ४२२ जागांसाठी ३१ हजार ६३ उमेदवारी अर्ज भरले होते. शुक्रवारी (दि.२१) जूनपासून उमेदवारांच्या शारीरिक चाचणीला प्रत्यक्ष सुरुवात झाली. नेहूली येथील जिल्हा क्रीडा संकुलासह आरसीएफ क्रीडा संकुलामध्ये मैदानी चाचणी घेण्यात आली. या चाचणींतर लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा मागील महिन्यात ११ ऑगस्टमध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली.

सर्वसाधारण शिपाई पदासाठी होणाऱ्या लेखी परीक्षेला चार हजार ७४७ उमेदवार उपस्थित होते. परीक्षा होऊन एक महिना होत आला आहे. तरीदेखील भरतीचा निकाल जाहीर झाला नाही. त्यामुळे भावी पोलिसांना निकालाची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

**बाजारपेठांमध्ये उत्साह, ग्राहकांची गर्दी पूजा साहित्य, मखर,खरेदीची लगबग**

# बाप्पाच्या स्वागतासाठी खरेदीत्सोव



### फूलबाजारात गर्दी

रायगड जिल्ह्यातील मुख्य बाजारपेठेमध्ये हार, फुले, पूजेचे साहित्य, अलंकार, नैवद्य, सजावटीचे साहित्य किरकोळ सामान घेण्यासाठी ग्राहकांची झुंबड उडाल्याचे पाहायला मिळाले. बाजारपेठ आणि फुलबाजार हा विविध साहित्य, पणती धूप, अगरबत्ती, सजावटीच्या कंठमाळा आदी साहित्यांच्या दुकानात मोठी गर्दी पाहायला मिळाली. गणपतीच्या आगमनाला दोन दिवस असल्याने फूलबाजारात गर्दी नव्हती, मात्र सजावटीसाठी कृत्रिम शोभेच्या फुलांना यंदाही मागणी असल्याचे दिसून आले. कपडे घेण्यासाठी ग्राहकांनी गर्दी केल्याचे दिसले. रस्त्या वर चालण्यासही जागा नसल्याने येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना कोंडीची समस्या उद्‌भवली.

### खरेदीवर अखेरचा हात

अलिबाग बाजारपेठ असलेल्या बाजारात विविध पूजेच्या लहानसहान साहित्यांची दुकानेही सजलेली आहेत. शहरात सलग असलेल्या दुकानांमध्ये आकर्षक विद्युत माळा, कृत्रिम फुलांच्या विविध आकाराच्या आणि रोषणाईच्या मखर, कृत्रिम फुलांच्या सजावटीच्या अनेक मखरी पाहायला मिळाल्या. नेहमीप्रमाणे गणेशोत्सवाची खरेदी ही जोमात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे दुकानदारांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे महागाईने उच्चांक गाठला असला तरी खिशाला परवडेल आणि झेपेल इतकी खरेदी भक्तांनी केली आहे. त्यात उत्साहाची कंजुषी कुठेच दिसली नाही. त्यामुळे व्यापारीवर्गातही आनंदाचे वातावरण आहे.

**। रायगड । प्रतिनिधी ।**

बाप्पाच्या आगमनासाठी आता अवघे पाच दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे तयारीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. त्यात आगमनाआधीचा शेवटचा आठवडा असल्याने गणेशभक्तांनी हा हक्काचा मुहूर्त साधत बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी गर्दी केली आहे.

मखरांच्या ऑर्डर देण्यापासून ते सजावटीचे सामान खरेदी करणे, पूजासाहित्य, अलंकारासह विविध वस्तूंची खरेदी करण्यात चाकरमानी व्यस्त असल्याचे दिसले. दुकानांपेक्षा रस्त्यांवर सजणाऱ्या मॉलमधून खरेदी करण्याचा कल जास्त दिसून येत होता. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील मुख्य बाजारपेठेतील रस्तेही गर्दीने हाऊसफुल झाले आहेत.

७सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव त्याच भक्तीभावात आणि धुमधडाक्यात साजरा करण्यासाठी गणेशभक्त सज्ज झाले आहेत. हजारो चाकरमानी गणपतीसाठी गावी येणार आहेत, पण शहरात राहून घरी बाप्पा आणणाऱ्यांची संख्याही हजारोंच्या वर आहे. त्यामुळे आपल्या बाप्पाची मूर्ती सुबक दिसण्यासोबत त्याला साजेसा मखर, सजावट करण्याची लगबग सध्या सर्वत्र दिसत आहे. त्यातच बाप्पाच्या आगमनाआधीची हक्काची म्हणजे सुट्टी एक आठवड्याआधी मिळाल्याने ती खरेदीसाठी सत्कारणी लावल्याचा बेत रायगडकरांनी आखल्याचे दिसले. सकाळपासूनच बाजारात त्यामुळे गर्दी होण्यास सुरुवात झाली. दुपारच्या जेवणानंतर ही गर्दी हळूहळू वाढण्यास सुरुवात झाली.



# बुलडोझर रोखला

झटपट न्यायाच्या नावाखाली लोकांच्या घरावर बुलडोझर फिरवणाऱ्या भाजपच्या मुजोर मुख्यमंत्र्यांना थोडा चाप लावला जाण्याची आशा निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने उशिरा का होईना याबाबत निर्णय घेतला आहे. एखाद्या गुन्ह्यात एखाद्याचे आरोपी म्हणून नाव आले की, बुलडोझर लावून त्याचे घर पाडून टाकण्याची पध्दत उत्तर प्रदेश व अन्य राज्यात सुरू झाली होती. त्याला आक्षेप घेणारी याचिका न्यायालयात दाखल झाली होती. त्यावर न्यायालयाने या राज्यकर्त्यांना चपराक लगावली व याबाबत मार्गदर्शक तत्वे जारी करू असे सांगितले. अर्थात यामुळे योगी आदित्यनाथ यांच्यासारख्या नेत्यांची अक्कल ठिकाणावर येईल असे नव्हे. होता होईल तो न्यायालयाला किरकोळीत काढण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. पूर्वी मोदींच्या नागरिकता नोंदणी कायद्याला विरोध करणाऱ्या लोकांची नावे व फोटो त्यांनी लखनौ शहरातल्या होर्डिंगवर ठळकपणे लावली होती. भाजपच्या गुंडांनी या लोकांवर हल्ले करावे अशी जणू चिथावणीच होती. याला सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवूनही तसे प्रकार घडत राहिले होते. आताही कायद्यातील पळवाटांचा फायदा घेऊन व न्यायालयाला आव्हान देण्यासाठी मुद्दाम असे प्रकार घडवले गेले तर नवल वाटायला नको. २०१७ मध्ये योगी आदित्यनाथांनी राज्यातील गुंडगिरी संपवण्याच्या नावाखाली या बुलडोझर न्यायाला राजमान्यता दिली. विशेषतः मुस्लिम समाजातील आरोपींविरुध्द याचा विशेष वापर करण्यात आला. एखाद्या अगदी चोरी किंवा मारामारीच्या गुन्ह्यात जरी एखाद्याचे आरोपी म्हणून नाव आले की, स्थानिक पालिका वा अन्य सरकारी अधिकाऱ्यांनी त्याच्या घरावर नोटीस बजावावी आणि लगोलग त्याचे घर पाडून टाकावे असे प्रकार सुरू झाले. प्रयागराजमधील जावेद महंमद यांचे घर पाडण्याचा प्रकार विशेष गाजला. भाजपच्या प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी पैगंबर महंमद यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह विधानांच्या विरोधात प्रयागराजमध्ये मुस्लिमांनी निदर्शने केली होती. त्यात काही हिंसक प्रकारही घडले होते. त्यांना जबाबदार धरून जावेद यांना अटक करण्यात आली व लगेच त्यांचे घरही पाडण्यात आले.

## सरकारी गुंडगिरी

वास्तविक जावेद हे साधे कार्यकर्ते होते. अशा हिंसेची शक्यता घेऊन मुळात त्यांनी नुपूर शर्मांविरुध्द आंदोलन करू नये असे जाहीर आवाहन आदल्या दिवशी केले होते. त्याचे पुरावे असूनदेखील पोलिसांनी त्यांना दंग्यांचे मास्टरमाइंड ठरवले व त्यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायदा लावला. त्यांच्याकडे घराचे सर्व कायदेशीर कागद असून तसेच त्यांनी पालिकेचा कर भरल्याच्या पावत्या असूनही त्यांचे घर बेकायदा असल्याचे दाखवण्यात आले. पालिकेने त्यांना नोटीस दिली व त्यांचे म्हणणे ऐकूनही न घेता चोवीस तासांच्या आत घर पाडून टाकण्यात आले. याच रीतीने पूर्ण उत्तर प्रदेशभर सर्वत्र योगी आदित्यनाथांच्या पोलिसांनी हैदोस घातला. यामध्ये काही नामचीन गुंडांची घरे पाडण्यात आल्याने जनता खूष झाली. मात्र याच खुषीचा व पाठिंब्याचा फायदा घेऊन आदित्यनाथांनी आपल्या राजकीय विरोधकांच्या घरांवरही बुलडोझर चालवले. मुळात एखाद्या व्यक्तीवर अगदी खून किंवा बलात्काराचा आरोप असला तरीही त्याला त्याच्या गुन्ह्यात कायद्यानुसार खटला चालवून शिक्षा होणे हे अधिक महत्वाचे व आवश्यक असते. दुर्दैवाने आपल्याकडच्या न्यायव्यवस्थेत अशी प्रकरणे अनेकदा रेंगाळतात व कित्येकदा आरोपी पुरेशा पुराव्याअभावी सोडले जातात. त्यामुळे न्याय मिळत नाही अशी भावना जनतेत तयार होते. तिला खूष करण्यासाठी ही घरे पाडण्याची मोहिम योगींनी काढली. नंतर मध्य प्रदेश व इतर भाजपशासित राज्यांमध्येही याचे प्रयोग सुरू झाले. तेव्हा तर पंतप्रधान आवास योजनेतून मिळालेली घरेही बेकायदा म्हणून पाडण्यात आली. मध्यंतरी महाराष्ट्रातही गाय पट्ट्यातील ही नीती अवलंबण्याचा प्रयत्न झाला. दिल्ली दंग्यांच्या वेळी खुद्द अमित शाह यांच्या पोलिसांनी हाच प्रयोग केला. त्यावेळी तीस तीस वर्षांपासून असलेली कायदेशीर दुकाने केवळ चोवीस तासांची नोटीस देऊन पाडण्यात आली. अखेर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देऊन ही सरकारी गुंडगिरी थांबवली.

## मूर्ख भक्त

भाजपच्या मूर्ख भक्तांना असला न्याय हाच खरा असे वाटते. पण यामध्ये गरीब, निरपराध भरडले जाण्याचा धोका असतो याची पर्वा त्यांना नसते. तसेच उद्या विरोधी पक्ष सत्तेत आला तर तोदेखील हाच न्याय लावून याच भक्तांचीही घरे उद्ध्वस्त करू शकतो हे त्यांच्या लक्षात येत नाही. नोटबंदी करूनही देशातील काळा पैसा संपला नाही. उलट सामान्यांनाच त्रास झाला. तद्वत सर्व प्रकारचे गुन्हेगार व गुंड हे कोणत्याही सत्तेशी बरोबर जुळवून घेतात व सत्ताधीशांनाही ते हवेच असतात. यात बहुतेकदा बळी जातात ते रस्त्यावरचे गरीब व सामान्य लोकांचे. कोणे एके काळी मुंबईत अतिक्रमणविरोधी पथकाचा मोठा गवगवा होता. गो.रा. खैरनार यांनी दाऊदच्या मालमत्तांवर कारवाई केल्याने ते मोठे मसीहा आहेत असे चित्र तयार झाले. पण पुढच्या काळातल्या अधिकाऱ्यांनी या पथकाच्या धाकाचा गैरवापर केला. कारवाईची धमकी देऊन खंडणी मागण्याचे व बेकायदेशीर कारवाई केल्याचे आरोप झाले. बनावट पोलिस चकमकीत गुंडांना मारण्याचे प्रकार हेही बुलडोझर थाटाच्या कारवाईचे उदाहरण. त्यामुळे मुंबई पोलिस दलामध्ये जणू गुंड अधिकाऱ्यांच्या टोळ्या तयार झाल्या. उत्तर प्रदेशातही हेच चालू आहे. दुर्दैवाने याची थेट झळ लागत नसलेल्या मध्यम वर्गाला असल्या न्यायाचे फार आकर्षण वाटते. दोन वर्षांपूर्वी अमेरिकी शहरांमध्ये काढलेल्या भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या परेडमध्ये बुलडोझरचा समावेश करून योगी आणि मोदींचा गौरव करण्यात आला. हे करणारे श्रीमंत भारतीय अनेक भानगडींमध्ये अडकलेले असतात. आपल्या मायदेशात अनेक काळे धंदे किंवा काळ्या पैशांचे व्यवहार करीत असतात. भारतात अनेक बड्या उद्योगपतींनी सरकारी बँकांचे लाखो कोटी रुपयांचे कर्ज थकवलेले वा बुडवलेले आहे. या सर्वांवर बुलडोझर चालवावा अशी मागणी हे तथाकथित भक्त कधीही करत नाहीत. अनिल अंबानी हे अशा पैसेबुडव्यांचे ठळक उदाहरण आहे. प्रत्यक्षात याच मोदींच्या पुढाकाराने झालेल्या राफेल व्यवहारात महत्वाचे कंत्राट मिळवून दिले गेले होते.

विचार

# गब्बरची निवृत्ती

***भारताचा सलामीचा फलंदाज शिखर धवनने अचानक निवृत्तीची घोषणा करून क्रिकेटप्रेमींना धक्का दिला. आनंदी, हसरा, मिश्यांना झोकात पीळ देणारा शिखर 'गब्बर' या टोपणनावाने ओळखला जाऊ लागला. आक्रमक फलंदाजीने मैदान गाजवणाऱ्या शिखरला दुखापतींनी ग्रासल्याने भारतीय संघाबाहेर पडावे लागले. त्यानंतर शिखरकडे दुर्लक्षच झाले. शिखरच्या निवृत्तीमुळे भारतीय क्रिकेटमधला एक आक्रमक अध्याय संपला आहे.***

शिखर धवन... भारताचा एके काळचा सलामीवीर आणि हिटमॅन रोहित शर्माचा सलामीचा साथीदार. शिखरने अनेक सामने गाजवले. सध्याच्या क्रिकेटला साजेशी आक्रमकता शिखरच्या फलंदाजीत होती. शिखर समोर असला की भल्या भल्या गोलंदाजांच्या मनात धडकी भरायची. संघाला चांगली सुरूवात करून देण्याची जबाबदारी त्याच्या खांद्यांवर असायची. शिखरने तब्बल बारा वर्षे भारतीय क्रिकेटची सेवा केली. शिखरने २०१० मध्ये भारतीय क्रिकेट संघात पदार्पण केले असले तरी २००४ च्या एकोणीस वर्षांखालील युवकांच्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतच आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवली. शिखर त्या स्पर्धेतला सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. तीन शतके आणि एका अर्धशतकाच्या बळावर शिखरने ५०५ धावा केल्या होत्या. त्यावेळी त्याची सरासरी होती ८४.१६ आणि स्ट्राईक रेट होता ९३.५१. बांगलादेशमध्ये आयोजित या स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानने भारताचा पराभव केला असला तरी शिखरला स्पर्धेतल्या सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला होता. १९ वर्षांखालील एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक धावा करण्याचा त्याचा विक्रम २०२२ पर्यंत अबाधित राहिला होता. या विश्वचषकानंतर शिखर धवन या नावाने सर्वांचे लक्ष वेधले. शिखर धवनच्या अंगी गुणवत्ता ठासून भरली होती. युवा विश्वचषकातल्या देदीप्यमान कामगिरीनंतरही शिखरच्या भारतीय संघातल्या पदार्पणासाठी २०१० हे वर्ष उजाडावे लागले. त्याची सुरूवात मनासारखी झाली नाही. २०१० ते २०११ या कालावधीत खेळलेल्या पाच एकदिवसीय सामन्यांमध्ये शिखरने अवघ्या ६९ धावा केल्यामुळे शिखरने भारताच्या एकदिवसीय संघातले स्थान गमावले.

मात्र २०१३ हे वर्ष त्याच्या कारकिर्दीला कलाटणी देणारे ठरले. इथूनच नव्या शिखर धवनचा उदय झाला. क्रिकेटचे उंच शिखर गाठायला हा युवा फलंदाज सज्ज झाला होता. २०१३ मधल्या ऑस्ट्रेलियाच्या भारत दौऱ्यादरम्यानच्या मोहाली कसोटीत शिखरने कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. ऑस्ट्रेलियासारखा संघ समोर असतानाही युवा शिखर अजिबात डगमगला नाही. आधीचे अपयश मागे टाकून नव्या उमेदीने फलंदाजीला उतरला. त्याने ही कसोटी गाजवली, अवघ्या ८५ चेंडूंमध्ये कसोटी शतक झळकावले. हे पदार्पणात एखाद्या फलंदाजाने कसोटीत झळकावलेले सर्वात वेगवान शतक होते. शिखर शतकावर थांबला नाही तर १८७ धावा केल्या. या कामगिरीच्या बळावर शिखरला एकदिवसीय संघात पुन्हा संधी मिळाली. २०१३ च्या आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धेतल्या चमकदार कामगिरीने एकदिवसीय क्रिकेटमधील शिखरच्या कारकिर्दीला नवसंजीवनी मिळाली. या स्पर्धेत भारताने मिळवलेल्या विजयात शिखरचा सिंहाचा वाटा होता. शिखर सलामीवीर म्हणून स्पर्धेत उतरला. आपल्यावर दाखवलेला विश्वास त्याने सार्थ ठरवला. त्याने या स्पर्धेत ३६३ धावा केल्या. स्पर्धेतल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात त्याने शतकी खेळी साकारताना ११४ धावा करत एकदिवसीय संघातले पुनरागमन साजरे केले. हे शिखरचे पहिले एकदिवसीय शतक होते. त्यानंतर त्याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यातही शतक झळकावले.

**श्रीशा वागळे**

एकमागोमाग झळकवलेल्या दोन शतकांमुळे शिखरचा आत्मविश्वास चांगलाच वाढला होता. यानंतर पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध त्याने अनुक्रमे ४८ आणि ६८ धावा केल्या. इंग्लंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याने २४ चेंडूंमध्ये ३१ धावा करत भारताचा विजयाचा मार्ग मोकळा केला. या स्पर्धेत शिखरने ९०.७५ च्या सरासरीने आणि १०१.३९ च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. त्याने आक्रमकतेला सातत्याची जोड दिली. या स्पर्धेत त्याला मालिकावीर म्हणून गौरवण्यात आले. दोन वर्षे संघाबाहेर राहिल्यानंतर झालेल्या दणदणीत पुनरागमनामुळे आणि या पुरस्कारामुळे शिखर धवन भारावून गेला होता. या पुरस्कार आपल्यासाठी खूपच महत्त्वाचा असल्याचे त्याने बक्षिस समारंभानंतरच्या मुलाखतीत म्हटले होते. शिखर धवन हा भारताचा या स्पर्धेतला खरा नायक होता. मात्र या विजयाचे श्रेय शिखरच्या वाट्याला आले नाही. तो अन्य खेळाडूंच्या छायेतच राहिला. २०१३ हे शिखरच्या एकदिवसीय कारकिर्दीतले सर्वोत्तम वर्ष म्हणता येईल. या वर्षातल्या २६ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ५०.५२ च्या सरासरीने आणि ९७.८९ च्या स्ट्राईक रेटने ११६२ धावा केल्या. या वर्षभरात त्याने आक्रमकतेने आणि जलदगतीने खेळत खोऱ्याने धावा केल्या. त्याच्या रुपात भारताला एक आक्रमक आणि गुणवान सलामीवीर लाभला.

२०१३ च्या चॅम्पियन्स चषकानंतर शिखर धवनने सलामीवीर म्हणून भारतीय संघात स्थान पक्के केले. २०१५ च्या एकदिवसीय विश्वचषकात शिखरने पुन्हा एकदा कमाल केली. स्पर्धेतल्या आठ सामन्यांमध्ये ४१२ धावा करत शिखर धवन या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज बनला. पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्याच सामन्यापासून शिखरने चुणूक दाखवायला सुरूवात केली. या सामन्यात त्याने ७२ धावा केल्या. त्यानंतर दक्षिण आफ्रिका आणि आयर्लंडविरुद्ध दोन दमदार शतकेही ठोकली. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात त्याने १३७ धावा केल्या. या सामन्यात रोहित शर्मा तिसऱ्याच षट्कात धावबाद झाल्यानंतर शिखरने सगळी जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेतली. विराट कोहली आणि अजिंक्य राहणे यांच्या साथीने त्याने भारताला चांगली धावसंख्या रचून दिली. याआधीच्या म्हणजे १९९२, १९९९ आणि २०११ च्या एकदिवसीय विश्वचषकांमध्ये दक्षिण आफ्रिकेने भारताचा दारुण पराभव केला होता. मात्र या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा १३० धावांनी पराभव करत सव्याज परतफेड केली. शिखर धवनच्या शतकामुळेच हे शक्य झाले होते. २०१७ च्या चॅम्पियन्स चषक स्पर्धेत त्याने २०१३ च्या कामगिरीची पुनरावृत्ती केली. या स्पर्धेतल्या पाच सामन्यांमध्ये शिखरने ३३८ धावा केल्या. याही वेळी तो स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आणि मालिकावीराचा गोल्डन बॅट पुरस्कार पटकावला. चॅम्पियन्स चषक स्पर्धेत त्याने सलग दुसऱ्यांदा हा किताब पटकावला.

२०१९ च्या विश्वचषकातही शिखर धवनने धडाक्यात सुरूवात केली होती. या स्पर्धेतल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात त्याने १०९ चेंडूंमध्ये ११७ धावा केल्या. त्याच्या या खेळीमुळे भारत ऑस्ट्रेलियाला पराभूत करू शकला. दुर्दैवाने शिखरची ही अखेरची आयसीसी स्पर्धा ठरली. या सामन्यानंतर शिखरला दुखापतीमुळे विश्वचषक स्पर्धा अर्ध्यावर सोडावी लागली. शिखरने आयसीसी स्पर्धा गाजवल्या. या स्पर्धांमधली त्याची कामगिरी थक्क करणारी होती. एकदिवसीय विश्वचषक आणि चॅम्पियन्स चषक स्पर्धांमध्ये खेळलेल्या २० सामन्यांमध्ये शिखरने सहा शतके आणि दहा अर्धशतके ठोकली. या स्पर्धांमधली त्याची सरासरी किमान १००० धावा केलेल्या ५१ फलंदाजांमध्ये सर्वाधिक राहिली. विराट कोहलीच्या ६४.५५ च्या सरासरीपेक्षाही धवनची सरासरी काहीशी अधिक राहिली.

या दिग्गज फलंदाजांमध्ये सर विवियन रिचर्डस, सईद अन्वर आणि केन विलियमसनसारख्या मातब्बर फलंदाजांचा समावेश आहे. फक्त विश्वचषकाचा विचार केल्यास शिखर धवनची दहा सामन्यांमध्ये ५३.७० इतकी सरासरी आहे. तर चॅम्पियन्स चषकातल्या दहा सामन्यांमध्ये त्याने ७७.८८ च्या सरासरीने धावा केल्या. शिखर धवनने १६७ एकदिवसीय सामन्यांमधल्या १६४ डावांमध्ये ४४.११ च्या सरासरीने आणि ९१.३५ च्या सरासरीने ६७९३ धावा केल्या आहेत तर ३४ कसोटी तसेच ६८ टी-२० मध्ये अनुक्रमे २३१५ आणि १७५९ धावा केल्या.एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने सर्वोत्तम कामगिरी केली. सर्वात जलद ६००० धावा करणारा विराट कोहली नंतरचा तो दुसऱ्या क्रमांकाचा भारतीय फलंदाज आहे.

इतकेच नव्हे, तर तो एकदिवसीय सामन्यांमध्ये ४० पेक्षा अधिक सरासरी आणि ९० पेक्षा अधिक स्ट्राईक रेटने पाच हजारांहून अधिक धावा करणाऱ्या जगातल्या आठ फलंदाजांमध्ये आहे. मधल्या काळात शिखरला वैयक्तिक आयुष्यात संकटांना सामोरे जावे लागले. त्याचा घटस्फोट झाला. तो २०२२ मध्ये अखेरचा एकदिवसीय सामना खेळला. त्यानंतर त्याला संधी मिळाली नाही. शिखर सतत महेंद्रसिंह धोनी, रोहित शर्मा, विराट कोहली यांच्या छायेत राहिला. आयसीसी स्पर्धांमध्ये थक्क करणारी कामगिरी करूनही शिखरच्या वाट्याला म्हणावे तितके कौतुक आलेच नाही. मात्र त्याची कामगिरी बोलकी आहे. आज शिखर निवृत्त झाला असला तरी आयसीसी स्पर्धांमधली त्याची कामगिरी कधीही विसरता येणार नाही. भारतीय क्रिकेटमधल्या या 'गब्बर'ने साकारलेल्या महत्त्वपूर्ण खेळी नेहमीच स्मरणात राहिल.

आजकाल

# गोव्यात पुन्हा मराठी विरोधकांनी खाल्ली उचल

आजवर गोव्याच्या बोकांडी बसलेल्या इंग्रजीऐवजी राज्याचा सर्व प्रशासकीय व्यवहार मराठी आणि कोकणीतून करण्याच्या दिशेने सरकार पावले टाकत असताना, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कोंकणी साहित्यिक दामोदर मावजो यांनी गोव्याच्या राजभाषा कायद्यातील मराठीचे स्थान हद्दपार करण्याची मागणी करून त्यात अकारण मिठाचा खडा टाकला आहे. मराठीप्रेमींकडून त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत, त्यामुळे ह्या वक्तव्याची दखल घेणे भाग आहे. आमदार श्री. विजय सरदेसाई यांनी अलीकडेच राज्य विधानसभेत 'मराठी खंयची?' असा सवाल करून वादाला तोंड फोडले होते आणि नंतर मराठीप्रेमींच्या संतापाचा अंगार बाहेर पडताच निमूटपणे जाहीर माफीही मागितली होती. तरीही मावजो यांच्यासारख्या बहुभाषाप्रेमी म्हणवणाऱ्या मान्यवर व्यक्तीने असे विधान करावे ह्याचे खरोखर आश्चर्य वाटते. गोव्यामध्ये मराठी भाषेचा शतकानुशतकांचा वारसा आहे आणि येथील जनमानसातील तिचे स्थान आजही अढळ आहे. तिच्या उच्चाटनाचे हरेक प्रयत्न आजवर झाले. काहींनी तर ख्रिस्ती समाजाला चिथावून त्यासाठी आकाशपाताळ एक केले, परंतु मराठी हद्दपार करू पाहणाऱ्या जुलमी पोर्तुगिजांना देखील अखेरीस तिचीच कास धरावी लागली होती हा गोव्याचा इतिहास आहे. मराठी भाषेला येथील सार्वजनिक जीवनातून हद्दपार करण्याची ही दिवास्वप्ने मराठी येथून नाहीशी झाल्याशिवाय कोकणीला जनस्वीकृती मिळणार नाही ह्या न्यूनगंडापोटीच पाहिली जात आहेत, परंतु कोकणीला अजूनही आम जनतेकडून लेखन-वाचन व्यवहारात जर स्वीकारले जात नसेल, तर त्याचे कारण मराठी हे नसून नित्यवापरातील साध्या सोप्या शब्दांऐवजी विशिष्ट वर्गाच्या आणि कृत्रिमपणे घडवलेल्या शब्दांनाच प्रमाण ठरवण्याचा अट्टहासच कारणीभूत आहे. काही काळापूर्वी मुख्यमंत्री डॉ. सावंत बोलत असलेल्या बहुजनसमाजाच्या बोलीची काही घटकांकडून निर्दयी हेटाळणी झाली होती हे अद्याप विस्मरणात गेलेले नाही. एकीकडे आपला मराठीला विरोध नाही म्हणायचे आणि दुसरीकडे राजभाषा कायद्यातील मराठीचे सहभाषेचे स्थान काढून टाका अशी मागणी करायची हा तर दुटप्पीपणा झाला. बहुभाषाप्रेमाचा मुखवटा अशावेळी टराटरा फाटतो. खरे तर राजभाषा म्हणून कोकणीला स्थान मिळाले आणि मराठी ही सहभाषा म्हणून प्रशासनात स्वीकारली गेली, तेव्हाच राज्यातील भाषावादाला मूठमाती मिळायला हवी होती, परंतु ते घडले नाही, कारण मराठीचे हे सहभाषेचे स्थान ध्यानी घेऊन तिचा मान ठेवला गेला नाही, उलट तिच्या गळचेपीचा सतत प्रयत्न झाला. त्यामुळे मराठीप्रेमींच्या जखमाही ठसठसत राहिल्या. कोकणी आणि मराठी ह्या दोन्ही भाषांच्या वापरासाठी मध्यंतरी राजभाषा संचालनालयाने परिपत्रके काढली आणि दोन्हीही भाषा आपल्या लेखी तितक्याच महत्त्वाच्या आहेत ही भूमिका घेऊन भाजप सरकारने ह्या वादाला मूठमाती देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी सरकारी स्तरावर कोकणी अकादमीच्या धर्तीवर गोवा मराठी अकादमीची स्थापना देखील केली. तिच्याद्वारे सर्व स्तरांवर विधायक कार्य आजवर चालले आहे. मध्यंतरी शैक्षणिक माध्यमाचा वाद उद्भवला, तेव्हा भाषिक वादाला मूठमाती देत कोकणी आणि मराठी भाषाप्रेमी एकत्र आले आणि इंग्रजीच्या आक्रमणाविरुद्ध उभे राहिले, तेव्हा त्यातून एक सौहार्दाचे वातावरण राज्यात निर्माण होईल अशी अपेक्षा जागली होती, परंतु भाषावादाच्या मुळ्या अधूनमधून उगवतात आणि राज्याच्या सामाजिक सौहार्दाला ठेच पोहोचवण्याचा प्रयत्न करतात. राजभाषा कायद्यात कोणतीही दुरुस्ती केली जाणार नाही आणि तशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव नाही अशी स्पष्टोक्ती विद्यमान मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी नुकतीच विधानसभा अधिवेशनात केलेली आहे. असे असताना राजभाषा कायद्यातील मराठीचे स्थान हटविण्याची हुक्की मावजोंना का यावी? अशा घटना जेव्हा घडतात तेव्हा त्यातून राज्याचे काही भले तर होत नाहीच, उलट सामाजिक वातावरण कलुषित बनून जाते. आपल्याला पुन्हा त्या भाषावादाच्या दलदलीत रुतायचे आहे काय? प्रशासनातील इंग्रजीचा वरचष्मा संपुष्टात आणण्याची आज खरी गरज आहे. राज्याच्या तळागाळापर्यंत, गोरगरीबांपर्यंत सरकारी प्रशासन न्यायचे असेल, विविध योजनांचा लाभ मिळवून द्यायचा असेल, त्यांना न्याय मिळवून द्यायचा असेल तर त्यांच्याशी प्रशासनाने त्यांच्या भाषेत व्यवहार केलाच पाहिजे. इंग्रजी न जाणणाऱ्या लाखो गोमंतकीयांना त्यांना अवगत असलेल्या देशी भाषांतून सरकारशी पत्रव्यवहार करण्याची संधी मिळवून देण्याच्या प्रयत्नात शासन असताना मराठीच्या उच्चाटनाचे, येथील जनमानसातून तिच्या हद्दपारीचे स्वप्न कोणी पाहणार असेल, तर ते कायम दिवास्वप्नच राहील.

लोकसंसद

## भेसळखोरांपासून सावधान!

गणेशोत्सवासारख्या सणावारांच्या दिवसात घरोघरी गोडधोड पदार्थांची रेलचेल असते. पण या आनंदाच्या आणि उत्साहाच्या वातावरणात कधी कधी मिठाचा खडा पडतो. कारण सणासुदीला तेल, तूप, मिठाई, दूध, दुग्धजन्य पदार्थ, रवा, मैदा, बेसन यांसारख्या अन्नपदार्थांना मोठी मागणी असल्यामुळे त्याचा फायदा घेत काही नतद्रष्ट लोक अन्नपदार्थांमध्ये भेसळ करतात. परिणामी मावा, मिठाई आणि प्रसादाच्या पदार्थांमधून अनेकदा विषबाधा झाल्याच्या घटना घडतात. त्यामुळे दरवर्षी अन्न आणि औषध प्रशासनाकडून (एफडीए) सणासुदीच्या काळात होणाऱ्या भेसळयुक्त अन्नपदार्थांच्या विरोधात विशेष मोहीम हाती घेतली जाते. प्रशासनाकडून अन्नपदार्थांची गुणवत्ता चाचणी करताना दुग्धजन्य पदार्थ तयार केल्याची व मुदत संपण्याची तारीख तसेच त्याची साठवणूक करण्याची पद्धत इत्यादी घटकांची तपासणी केली जाते. मात्र भाविकांना सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाची भेसळखोरांवर करडी नजर असली तरी आपणही या सणासुदीच्या काळात मिठाई, दूध आणि इतर दुग्धजन्य पदार्थांची खरेदी करताना सावधगिरी पाळणे आवश्यक आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## सुरक्षित प्रवासासाठी हेल्मेट वापरणे गरजेचे...


सध्या दुचाकी अपघाताचे प्रमाण वाढले असून त्यामध्ये प्रामुख्याने डोकीला गंभीर इजा होवून मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे प्रत्येकाने हेल्मेट घालून दुचाकी चालवावी यासाठी पोलिस वरचेवर प्रयत्न करतांना दिसतात मात्र याकडे दुर्लक्ष करुन दुचाकीस्वार विना हेल्मेटचे वाहन चालवून आपला लाख मोलाचा जीव गमावून बसतात देशांतील काही राज्यांत हेल्मेट सक्ती आहे तर काही ठिकाणी नाही मात्र प्रत्येकाने हेल्मेट वापरणे काळाची गरज आहे हे अपघातामध्ये घडलेल्या घटनांवरुन अधोरेखित झाले आहे आज झपाट्याने वाहनांची संख्या वाढत आहे त्याचं प्रमाणात अपघातही वाढत आहेत आपण वाहन चालवताना सुरक्षित असतो तोपर्यंत हेल्मेटचे महत्व कळत नाही मात्र अपघाताने डोक्याला गंभीर इजा होवून मृत्यू होतो त्यावेळी मात्र हेल्मेटचे महत्व कळते हे वास्तव आहे अवजड वाहनांने धडक दिली, एखाद्या वाहनाला दुचाकीस्वार जाऊन आदळला किंवा दुचाकी घसरुन रस्त्यावर पडली तर त्याचा फटका वाहनधारक दुचाकीस्वारालाचं बसतो यासाठी हेल्मेटचा वापर करणे गरजेचे आहे !

**- राजू जाधव,** मांगूर जि.बेळगांव

मराठी साहित्यिक दिनविशेष

**४ सप्टेंबर**

**१८३७:-** व्याकरणकार व कवी रेव्हरंड गणपत रघुनाथ नवलकर यांचा जन्म. 'नवीन मराठी व्याकरण' व 'नवीन मराठी बालव्याकरण' तसेच 'वाक्यवियोग आणि वाक्यसंयोग शास्त्र' ही पुस्तके लिहिली. संत तुकारामांच्या जीवनकार्याचा वेध घेणाऱ्या नवलकरांनी 'श्रीख्रिस्ती विजय' ही पोथीवजा दीर्घ पद्यरचना केली होती. याशिवाय नवलकरांचे 'नवीन गीत-संग्रह', 'पद्यात्मक कोमस नाटक', मिल्टनकृत 'कोमस' वरुन पाद्यात्मक, 'शमशोत'ल्स नाटक आणि 'सद्कोळी' हे टेनिसच्या इनॉक आर्डे नवरुन लिहिलेले नाटक अशी साहित्य संपदा. **१९०४:-** 'प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास' तसेच 'आद्य महाराष्ट्र आणि सातवाहनकाळ' हे महत्त्वाचे इतिहासग्रंथ लिहिणारे रघुनाथ महारुद्र भुसारी यांचा जन्म. निजामी अमलाखाली वाढलेले प्रा.भुसारी हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठात मराठीचे अध्यापन करीत. 'साहित्य आणि संशोधन' हा ग्रंथ लिहिला. तसेच दुर्मिळ ग्रंथांच्या प्रतींचे संपादन केले होते. **१९२०:-** ब्रिटिश अमदानीत गुप्त पोलिस तसेच दारुबंदी खात्याचे अधिकारी लेखक,



स्वातंत्र्यसेनानी शांताराम दत्तात्रय थत्ते यांचा जन्म. त्यांनी प्रौढ शिक्षण, कथा, उदयोग विषयक, संत विषयक बोधपर अशा वेगवेगळ्या स्वरुपाचे लेखन केले असून ह्यांचे 'अष्टावक्र गीता', 'अध्यात्मिक बोधकथा', 'अशोक आणि अमित', 'चटकदार कथा', 'कृष्णमाईच्या परिसरात', 'कोकण दर्शन', 'हास्य कथा आणि श्री स्वामी स्वरुपानंदाचे चरित्र त्यांनी लिहिले. **१९३२:-** 'गाथा मुहूर्तमेढीची', 'गाथा शोधांची', 'अनोखा उंबरठा', 'संधिप्रकाश', 'संस्कार' या विज्ञानविषयक लेखसंग्रहाचे लेखक शिक्षणतज्ञ विनायक गोपाळ कुलकर्णी यांचा जन्म. 'लोकसत्ता'त अनेक सदरे त्यांनी लिहिली होती. **१९३७:-** लेखक, पत्रकार, समीक्षक शंकर रामचंद्र सारडा यांचा जन्म. 'काही पुस्तके काही लेखक', 'गुलमोहर', 'ग्रंथ चैतन्य', 'स्त्रीवादी कादंबऱ्या' ही त्यांची काही पुस्तके. त्यांची बालसाहित्यात फार मोठी कामगिरी आहे. बालसन्मित्रमधील बाललेखकांच्या संपादनातून 'चतुर चंपा' हे पुस्तक त्यांनी साकारले. याशिवाय 'बोलके कमळ', 'मधुमुरली', 'राणीपरीची कृपा' ही बालकांसाठीची पुस्तके. तसेच साधनाचे सहसंपादक, महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक, विविध वृत्तपत्रातून स्तंभलेखन करणाऱ्या सारडांनी वाचकांमध्ये ग्रंथाची आवड निर्माण करणारे रसास्वादयुक्त परिक्षात्मक लेखन विपूल प्रमाणात केले. परिणामी, एक सापेक्षी समीक्षक ही त्यांची एक सापेक्षी ओळख. 'ललित'मधून त्यांची 'लक्षवेधी पुस्तके' या सदराला मराठी वाचकांनी दाद दिली. **१९४६:-** कवी एकनाथ बुधाजी बुद्धे यांचा जन्म. 'हे वेड कवितेचे' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९६७:-** संपादक, नाटककार अनंत हरी गद्रे यांचे निधन. 'निर्भीड' ह्या साप्ताहिकाचे संस्थापक असणाऱ्या गद्रेनी 'महाराष्ट्र शारदा' हे मासिकही काही काळ चालवले. रंगभुमीवर सामाजिक विषयांच्या नाटिका आणण्याची प्रथा त्यांनी सुरु केली.

**- संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


# शिवसृष्टीतील पुतळ्यांची तोडफोड

## शिवप्रेमींचा उद्रेक; मुख्याधिकाऱ्यांकडून पर्यवेक्षकाचे निलंबन

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**शहरातील मारुती मंदिर येथील शिवसृष्टीमध्ये असलेल्या मावळ्यांची तोडफोड केल्याची घटना घडली आहे. सकाळच्यावेळी ही घटना उघडकीस आल्यानंतर शिवप्रेमींनी नगर परिषदेचे उद्यान पर्यवेक्षक नितीन यादव यांना संपर्क साधण्यात आला. मात्र, त्यांनी कुणाचेच फोन घेतले नाहीत. यानंतर शिवप्रेमी नगर परिषदेत दाखल होत त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले होते. तसेच, उद्यान पर्यवेक्षकांच्या निलंबनाचा विषय देखील लावून धरला होता.**



मारुती मंदिर येथील शिवसृष्टीमध्ये असलेल्या मावळ्यांची तोडफोड अज्ञाताकडून केल्यानंतर त्याच्या संतप्त प्रतिक्रिया सर्वत्र उमटू लागल्या आहेत. नगर परिषदेचे उद्यान पर्यवेक्षक नितीन यादव यांना संपर्क साधण्यात आला. परंतु, त्यांनी कोणाचाच फोन उचलला नाही. यांनंतर शिवप्रेमी संघटनांनी थेट पोलीस स्थानकात धाव घेत सीसीटीव्ही सुरू केव्हा होणार, अशी विचारणा केली. मात्र, मारुती मंदिर परिसरात नगर परिषदेची जबाबदारी आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आणि संतप्त जमाव नगर परिषदेत येऊन धडकला. यावेळी शिवप्रेमींनी मुख्याधिकाऱ्यांना फोन करत तात्काळ येण्याचे सांगण्यात आले. मुख्याधिकारी नगर परिषदेत दाखल झाल्यानंतर त्यांच्या दालनात चांगले घमासान पहायला मिळाले. यावेळी शिवप्रेमींनी मुख्याधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले होते. कोट्यवधी रुपये खर्च करून तुम्ही पुतळे उभारता आणि १० हजारचा साधा सीसीटीव्ही तुम्हाला सुरक्षेसाठी लावता येत नाही, असा सवाल संतप्त शिवप्रेमींकडून करण्यात आला.

तसेच, उभारलेल्या पुतळ्यांची जबाबदारी कोणाची? एवढे प्रकार घडले तरी तुम्हाला जाग येत नाही. तुम्ही काही घडावं याची वाट पाहताय का? तात्काळ उद्यान पर्यवेक्षकाला निलंबित करा अन्यथा याच ठिकाणी उद्रेक होईल, असा इशारा हिंदूत्ववादी संघटनांनी दिला. यानंतर मारुती मंदिर येथील मावळ्यांच्या तोडफोड प्रकरणी उद्यान पर्यवेक्षकाला २ दिवस निलंबित केल्याचे घोषणा मुख्याधिकारी तुषार बाबर यांनी केली आहे. तसेच, याप्रकरणी चौकशी समिती स्थापन करून पुढील अहवालानंतर कारवाई केली जाईल, असे आश्वासन देखील दिले आहे.

### गरज नसतानाही पुतळ्यांची उभारणी

**कुणाच्याही मनात आले की लगेच शहरात पुतळे उभे राहतात. रत्नागिरीकरांची मागणी नसताना असे पुतळे का उभारले जात आहेत? यापुढे रत्नागिरीत एकही पुतळा उभारू नका. तुम्हाला पुतळ्यांना सुरक्षा देता येत नसेल तर शहरातील सर्व पुतळे आमच्या ताब्यात द्या, आम्ही सीसीटीव्ही स्वखर्चाने बसवतो, असे संतप्त शिवप्रेमींनी मुख्याधिकाऱ्यांना सांगितले.**

### सीसीटीव्ही कॅमेरे बसवणार

**यावेळी मुख्याधिकारी तुषार बाबर यांनी एक लेखी पत्र शिवप्रेमींना दिले आहे. २४ तासांत शहरातील पुतळ्यांजवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील. तसेच, पुतळ्यांच्या सुरक्षेसाठी २४ तास सुरक्षा रक्षक तैनात केले जाणार असल्याचे बाबर यांनी शिवप्रेमींना सांगितले. यानंतर शिवप्रेमी घोषणाबाजी करत कार्यालयातून बाहेर पडले.**

## नाल्यात आढळला महिलेचा मृतदेह

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर तालुक्याच्या पूर्व भागातील दुर्गम भाग असलेल्या सावरे ग्रामपंचायत हद्दीतील बर्डे पाड्यालगतच्या ओहोळात एक महिलेचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. सोमवारी (दि.२) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास डोंगरालगतच्या ओहोळात एक मृतदेह आढळून आला. हातपाय बांधून दगडाला बांधलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने मृत्यूबाबत संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, मनोर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाल्यानंतर पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला आहे. सुश्मिता प्रवीण डावरे (२८)असे या महिलेचे नाव आहे. तसेच, या महिलेचा पती मच्छीमार बोटीवर काम करीत असल्याची माहिती ग्रामस्थांकडून पोलिसांना देण्यात आली आहे.

## अतिक्रमणातील भंगाराचा लिलाव

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाकडून शहरातील अनधिकृत बांधकामांवर, बेकायदेशीरपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांवर तसेच धोकादायक इमारतींवर कारवाई केली जाते. यादरम्यान बरेच साहित्य जप्त करून महापालिका आपल्या ताब्यात घेते. तसेच, हे साहित्य गेल्या अनेक वर्षांपासून भाईंदर येथील उड्डाण पुलाखाली असलेल्या मोकळ्या जागेत ठेवल्यामुळे त्याला भंगाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शिवाय परिसरातील राहणाऱ्या नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे या साहित्याची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने लिलाव करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी घेतला आहे. याबाबत त्यांनी अतिक्रमण विभागाला साहित्याचे सर्वेक्षण करून निविदा प्रक्रिया राबवून घेण्याचे आदेश दिले आहेत. यात साहित्याच्या मूल्यांकनवरून योग्य पैसे देणाऱ्या कंत्राटदाराला हे साहित्य दिले जाणार असल्याची माहिती अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संजय दोंदे यांनी दिली आहे.



## प्रौढाचा आकस्मिक मृत्यू

**रत्नागिरी :** बेशुद्ध अवस्थेत असलेल्या प्रौढाला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. जैनेंद्र दयाशंकर सिंह (५०, रा. साई समर्थ अपार्टमेंट, मजगाव रोड रत्नागिरी) असे मृत प्रौढाचे नाव आहे. ही घटना शनिवार दि.३१ ऑगस्ट रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास जिल्हा शासकीय रुग्णालयात घडली आहे. जैनेंद्र हे सकाळी हॉलमध्ये बसलेले होते. सकाळी साडेआठच्या सुमारास त्यांना पहाण्यासाठी गेले असता जैनेंद्र यांची हालचाल होत नव्हती. तात्काळ त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

## ऐन गणेशोत्सवात चाकरमान्यांची कोंडी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोकणातील गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग राहिला आहे. यासाठी दरवर्षी मुंबईसह अन्य शहरांमधील हजारो चाकरमानी गणपती उत्सवाच्या काळात कोकणातील आपापल्या गावी जात असतात. मात्र, यंदा गणेशोत्सवाच्या तोंडावर महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ अर्थात एसटी कर्मचाऱ्यांनी संपाची हाक दिल्याने चाकरमान्यांची कोंडी होण्याची शक्यता आहे.

ऐन गणेशोत्सवात एसटी कर्मचाऱ्यांकडून मंगळवारी (दि.३) संपाची हाक देण्यात आल्याने एसटी महामंडळाकडून नियोजन करण्यास सुरुवात झाली आहे. गणपतीच्या काळात कोकणात जाण्यासाठी प्रवाशांची प्रचंड गर्दी होते. यामुळे या काळात कोकणात विशेष एसटी बसेस सोडल्या जातात. मात्र, एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे त्यावर परिणाम होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन एसटी प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच, कर्मचाऱ्यांना आंदोलनामध्ये भाग न घेण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

## मुख्याध्यापिकेवर निलंबनाची कारवाई

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील एका जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकाने विद्यार्थिनीशी अश्लील वर्तन केल्याचा प्रकार नुकताच उघड झाला होता. शाळेत अश्लील वर्तन करणाऱ्या शिक्षकाला पोलिसांनी अटक केली असून, त्याला पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून त्या शिक्षकासह हे प्रकार लपवून ठेवणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापिका रश्मी किंजळे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. याबाबत शनिवारी निलंबनाची नोटीस बजावली आहे.

संगमेश्वर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या एका प्राथमिक शाळेमधील संजय वामन मुळ्ये या शिक्षकाने विद्यार्थिनींशी अश्लील वर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार दोन दिवसांपूर्वी उघड झाला होता. पीडित विद्यार्थिनीने शिक्षकाच्या वर्तनाला कंटाळून आपल्या पालकांना सर्व प्रकार सांगितला. यानंतर तात्काळ शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि ग्रामस्थांची सभा घेण्यात आली. या सभेत संतप्त पालक व ग्रामस्थांनी झाल्या प्रकाराबद्दल जाब विचारल्यानंतर त्या शिक्षकाने सुरुवातीला 'तो मी नव्हेच' अशी भूमिका घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, पालक, ग्रामस्थ संतप्त झाल्याचे लक्षात येताच त्याने केलेल्या प्रकाराची कबुली दिली. या शिक्षकाला संगमेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

दरम्यान, याप्रकरणी संगमेश्वर पोलिस स्थानकात त्या शिक्षकावर गुन्हा दाखल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. या प्रकरणाची जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी त्या शिक्षकासह हा सर्व प्रकार माहीत असणाऱ्या मुख्याध्यापिकेलाही निलंबित केले आहे.

## विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**सिंधुदुर्ग :** सरंबळ इंग्लिश स्कूलमध्ये ग्रामपंचायतीतर्फे विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व करिअरविषयक मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शाळेतील शिक्षकांसोबतच समाज आणि पालकांची भूमिका महत्त्वाची असते, असे मुख्याध्यापक अनिल होळकर यांनी सांगितले. यावेळी महिला पोलीस ज्योती रायशिरोडकर यांनी सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. तसेच, सहाय्यक पोलीस अधीक्षक राजेंद्र पालवे यांनी पालक-शिक्षक यांचे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतील महत्त्वाचे स्थान समजावून सांगितले.

## दुसऱ्या दिवशीही मासेमारी ठप्प

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

समुद्रात मासेमारी करण्यासाठी दुसऱ्या दिवशीही हवामान अनुकूल नसल्याने सोमवारी (दि.२) एकही पर्ससीन नेट मासेमारी नौका समुद्रात गेली नाही. तसेच, इतरही पारंपरिक नौका बंदरातच उभ्या होत्या.

रविवार दि.१ सप्टेंबरपासून पर्ससीन नेट मासेमारीला परवानगी देण्यात आली आहे. पहिल्याच दिवशी समुद्रातील वादळी वाऱ्याच्या इशाऱ्यामुळे पर्ससीन नेट मासेमारीचा मुहूर्त हुकला आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी वातावरण किंवा हवामान अनुकूल होईल आणि नौका समुद्रात मासेमारीसाठी पाठवता येईल, अशी आशा नौका मालकांना होती. परंतु, पहिल्या दिवसापेक्षा सोमवारी हवामान आणखी खराब झाले. समुद्रातील पाण्याला करंट, उंच लाटा, जोरदार वाऱ्यासोबत मुसळधार पाऊस असल्याने या दिवशीही नौका समुद्रात जावू शकल्या नाहीत.

दरम्यान, पर्ससीन नेट मच्छिमार नौका मालकांनी आपापल्या नौका समुद्रात पाठवण्याची आवश्यक ती सर्व पूर्व तयारी पूर्ण केली होती. मागील मासेमारीच्या हंगामात बहुसंख्य नौकांना अपेक्षित मासळी रिपोर्ट न मिळाल्याने नुकसान झाले होते. नवीन हंगामात हे नुकसान भरून निघेल, अशी अपेक्षा असतानाच मासेमारीचे पहिले दोन दिवस समुद्रातील हवामान अनुकूल नसल्याने वाया गेले आहेत.



## एमआयडीसीला विरोध

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नगिरी शहराजवळील सडामिऱ्या-जाकीमिऱ्या भागातील १७६.१४९ हेक्टर खासगी क्षेत्र हे पोर्ट औद्योगिक क्षेत्र अर्थात बंदर एमआयडीसी म्हणून जाहिर करण्यात आले आहे. अधिसूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यापूर्वी मिऱ्या येथील स्थानिक ग्रामस्थांना याची कोणतीच माहिती देण्यात आली नव्हती. अधिसूचना वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर सडामिऱ्या-जाकीमिऱ्या येथील ग्रामस्थांमध्ये खळबळ उडाली. या संदर्भात सडामिऱ्या आणि जाकीमिऱ्या येथील दोन्ही ग्रामपंचायतींच्या ग्रामसभेमध्ये या प्रकल्पाविरोधात ठराव करण्यात आला होता. यानंतर सोमवारी (दि.२) मिऱ्या येथील अलावा येथे संपूर्ण मिऱ्या वासीयांची एकत्रित बैठक बोलावण्यात आली होती. याला माजी आमदार बाळ माने, दोन्ही ग्रामपंचायतींचे सरपंच तसेच वेगवेगळ्या पक्षातील पदाधिकारी, उद्योजक, व्यावसायिक, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

## साईडपट्टी खचल्याने एसटी कलंडली

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील पानवल येथे सोमवारी (दि.२) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास रस्त्याची साईडपट्टी खचल्याने एसटी कलंडल्याची घटना घडली आहे. ही एसटी बस रिकामी असल्याने सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी चालक आपल्या ताब्यातील एसटी (एमएच-२०-बीएल-४०२७) घेउन रत्नागिरी ते पानवल जात होता. ही एसटी ब्राम्हणवाडीच्या पुढे गेली असता पावसामुळे येथील रस्त्याची साईडपट्टी कमकूवत झाली होती. एसटी बस या साईडपट्टीवरून जात असता ती खचून बस कलंडली. यावेळी सुदैवाने बसमध्ये एकही प्रवासी नसल्याने कोणतीही जिवीत हानी झालेली नाही. तसचे, चालक आणि वाहकही बचावल्याने पुढील अनर्थ टळला. या अपघाताची नोंद ग्रामीण पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.



## चोरीच्या संशयावरून हत्या

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाण्यात चोरीच्या संशयातून चार सुरक्षा रक्षकांनी एकाची हत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी चौघांना अटक केले आहे.

मानपाडा येथील भवानी नगर परिसरातील इमारतीच्या २३ व्या मजल्यावरील सदनिकेत रविवारी एकजण जखमी अवस्थेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीनुसार चितळसर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी त्या व्यक्तीला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. प्रथमेश चव्हाण (२६) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी राजेश यादव (३०), प्रमोद कुमार यादव (२५), गंगाराम यादव (४१) आणि प्रकाश मोहीते (५०) या सुरक्षारक्षकांनी चोरीच्या संशयातून त्याला बेदम मारहाण केल्याचे उघडकीस आले. तसेच, पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी प्रकाश याने स्वत: पोलिसांना संपर्क साधून व्यक्ती जखमी असल्याची माहिती दिली होती.

### मुंबई-गोवा महामार्गाचे काम युध्दपातळीवर सुरू

# चाकरमान्यांची वाट होणार सुखकर

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असून चाकरमान्यांची पावले तयारीसाठी हळुहळू कोकणाकडे वळू लागली आहेत. पुढील दोन दिवसांपासून हे प्रमाण वाढणार असून, त्यामुळे चाकरमान्यांचा प्रवास सुखकर होण्यासाठी शासन व प्रशासनाने कंबर कसली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजवण्यासह अपूर्ण असलेले काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे. तसेच, कशेडी घाटाला पर्याय असणारा दुसरा बोगदा ५ सप्टेंबरला सुरू करण्यात येईल, असे राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून सांगण्यात आले आहे. यामुळे आता कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखर होणार असल्याचे बोलले जात आहे.**



मुंबई-गोवा महामार्गाच्या पळस्पे फाट्यापासून कशेडी घाटापर्यंतच्या रखडलेल्या कामांसह खड्ड्यात गेलेल्या मार्गामुळे गणेशभक्तांना यंदाही जीवघेणाच प्रवास करावा लागणार होता. मात्र, मुख्यमंत्री शिंदे यांनी या मार्गाची पाहणी करत अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. ३ सप्टेंबरपूर्वी महामार्ग सुस्थितीत आणण्याचे निर्देश दिले होते. मुख्यमंत्र्यांनी पाहणी केल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग खात्याने गणेशोत्सवापूर्वी शहामार्गावरील खड्डे बुजवत गणेशभक्तांचा प्रवास सुखकर करण्यासाठी कंबर कसली आहे.

यावेळी खड्डे बुजवण्यासाठी ४ अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांना दिल्या होत्या. त्यानुसार युद्धपातळीवर खड्डे बुजवून मार्ग सुस्थितीत आणण्याचे काम सुरू आहे. तसेच, पाहणीदरम्यान ३ सप्टेंबरपर्यंत दुसऱ्या बोगद्याचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन राष्ट्रीय महामार्ग खात्याच्या अधिकाऱ्यांसह ठेकेदारांनी दिले होते. त्यानुसार युद्धपातळीवर काम सुरू असल्याचा दावा केल्यानंतर शिंदे यांनीही दुसऱ्या बोगद्याचे काम पूर्ण होईल अन् कोकणात जाणारे चाकरमानी दोन्ही बोगद्यातून मार्गस्थ होतील, असा विश्वास व्यक्त केला होता. मात्र, प्रत्यक्षात दुसऱ्या बोगद्याचे काम संथगतीने सुरू आहे. तसेच, पोलादपूरकडून खेडकडे येणाऱ्या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य आहे. अंतर्गत कामेही अपूर्ण आहेत. दोन्ही बोगद्यांना जोडणारे रस्ते अर्धवट आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात कशेडी बोगदा ते आरवलीपर्यंतच्या दोन्ही लेन सुरु आहेत. आरवलीपासून संगमेश्वरपर्यंत जवळपास एकलेनपूर्णझालीआहे. सावर्डेवहाळफाटा, आरवली येथील जोडरस्ते, संगमेश्वरपर्यंत काही ठिकाणी असलेली डायव्हर्जनच्या ठिकाणी डांबरीकरण करण्यात येत आहे. तसेच, आंजणारी घाट रस्ता बऱ्यापैकी झाला असल्याने चाकरमान्यांचा प्रवास सुखकर होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

> **“ कशेडी बोगदा ५ सप्टेंबरला सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. बोगद्यातील काँक्रिटीकरणाची कामे सुरू आहेत. प्रकाशव्यवस्थेची कामे हाती घेण्यात आली असून, १०० हॅलोजन आणि ५० ट्यूबलाईट तात्पुरत्या स्वरूपात लावल्या जाणार आहेत. तसेच, गटारांची लाईनही तात्पुरती सुरू केली जाईल.**
> **- पंकज गोसावी, अभियंता, राष्ट्रीय महामार्ग. ”**

### जनआक्रोश समिती करणार पाहणी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २६ ऑगस्ट रोजी पाहणी करून ३ सप्टेंबरपूर्वी महामार्ग खड्डेमुक्त करण्याचे आश्वासन कोकणवासींना दिले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आश्वासनानंतर मुंबई-गोवा महामार्गाच्या स्थितीमध्ये आवश्यक सुधारणा झाली आहे का, याची खात्री करण्यासाठी मुंबई-गोवा जनआक्रोश समिती उद्या ४ सप्टेंबरपासून पळस्पे ते कासू दरम्यान दौरा करून महामार्गाची सद्यस्थिती तपासणार आहे. या महामार्गावर त्यानंतरही खड्डे निदर्शनास आल्यास यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना जाब विचारू, असे जनआक्रोश सदस्यांनी स्पष्ट केले आहे.**

निवडक

## पालक सभा संपन्न

**म्हसळा :** न्यू इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय म्हसळा येथे शिक्षक पालक व माता पालक संघ कार्यकारिणी निवड व सहविचार सभा संपन्न झाली. यावेळी अध्यक्षस्थानी समीर बनकर होते. ते आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,पालकांनी आपल्या मुलांकडे लक्ष देणे गरजेचे आहे, तसेच आपण सर्वजण मिळून एकत्र समन्वयाने येणाऱ्या अडचणीवर मात करून शाळेचा विकास कसा होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## शैक्षणिक साहित्य वाटप

**म्हसळा :** ग्रामपंचायत मेंदडी यांच्यामार्फत जिल्हा परिषद शाळा मेंदडी मराठी येथील इयत्ता पहिली ते सातवी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये वही, पेन, कंपास पेटी तसेच शाळेसाठी अग्निशमन यंत्र व ३ सिलिंग फॅन देण्यात आले ते आज शाळा व्यवस्थापन समितीचे मार्फत वाटप करण्यात आले. यावेळी तुळशीराम पाटील, महादेव पानवलकर, मोरेश्वर पाटील, रवींद्र कांबळे आदी उपस्थित होते.

## महिला संघटनेचे आंदोलन

**पनवेल :** नवनाथनगर महिला संघटनेतर्फे महानगरपालिका प्रवेशद्वारासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते. सर्वांना समान संधी समान कायदा भारतीय संविधान मुलभूत कायद्याप्रमाणे पनवेल मनपा प्रशासन झोपडपट्टी धारकांना घर पावती, कर पावती दिली आहे. झोपडपट्टी धारकांना घर पावती, कर पावती दिलेली नाही. हा भेदभाव का? असा सवाल महिला संघटनेतर्फे करण्यात आला असून घरांची कर पावती चालू करण्याकरिता आंदोलन छेडले होते.

## सुरक्षा समिती सभा संपन्न

**महाड :** नवयुग विद्यापीठ ट्रस्ट संचालित नवयुग मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सखी सावित्री व विद्यार्थी सुरक्षा समितीची सभा संपन्न झाली. समिती सदस्य व लाडवलीचे पोलीस पाटील इलियास ढोकळे यांनी विद्यार्थी सुरक्षेबाबत अनेक उपायोजना सुचवताना संस्थेने शाळेमध्ये सीसीटीव्ही, गेटवर वॉचमन, प्रत्येक येणाऱ्या-जाणाऱ्यांची नोंद ठेवणे, तकारपेटी, कर्मचाऱ्यांबाबत माहिती ठेवणे यासह केलेल्या उपाययोजनांबाबत समाधान व्यक्त केले.

## एक दिशा मार्गासाठी निवेदन

**आगरदांडा :** मुरुड जुनी पेठ विठ्ठल मंदिर रस्ता वर गतिरोधक व एक दिशा मार्ग करावा या करीता श्री काळभैरव विठ्ठल रूक्मिणी देवस्थान मुरुड जुनी पेठ यांच्या वतीने मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. हे निवेदन सहाय्यक कर निरीक्षक नंदकुमार आंबेतकर यांनी स्वीकारला. यावेळी श्री काळभैरव विठ्ठल रूक्मिणी देवस्थानाचे अध्यक्ष-डॉ विश्वास चव्हाण,मोहन करंदेकर, खजिनदार प्रकाश चव्हाण, कोतवाल आदी उपस्थित होते.

# शिधा वाटपात अडचणींचा डोंगर

## चार जिन्नसांपैकी केवळ साखरेचा साठा उपलब्ध; लाभार्थींना प्रतीक्षा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**गणेशोत्सवानिमित्ताने अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांना रेशन दुकानामधून आनंदाचा शिधा मिळणार असल्याची घोषणा करून जवळपास महिना झाला आहे. गणेशोत्सवाला काही दिवस शिल्लक असताना रवा, चणाडाळ, पाम तेलापैकी साखरेचा साठा जिल्ह्यातील फक्त तीन गोदामांमध्ये दाखल झाला आहे. इतर वस्तूंचा अद्याप पत्ताच नाही. त्यामुळे उरलेल्या पाच दिवसांत आनंदाचा शिधा मिळणार कसा, असा प्रश्न जिल्ह्यातील लाभार्थी विचारत आहेत. नेहमीप्रमाणे आताही जिल्हा पुरवठा विभागाला आनंदाच्या शिधाचे वेळेत वाटप करण्यात अडचणी येत असल्याचे दिसून येत आहे.**

सण-उत्सवाआधी आनंदाचा शिधा मिळाला, असे आतापर्यंत एकदाही झालेले नाही. होळी, दिवाळी, गणेशोत्सवानंतरच आनंदाच्या शिधाचे वाटप होते. शेवटच्या ग्राहकांना काही वस्तू मिळतात, तर काही वस्तू कीटमधून गायब झालेल्या असतात. आतातर पुरवठा विभागाने कहरच केला आहे. जिल्ह्यात लाभार्थी कार्डधारकांची एकूण संख्या चार लाख ६३ हजार ६१० इतकी असताना एकूण तीन लाख ९६ हजार ९९१ इतक्याच लाभार्थ्यांचे धान्य मंजूर झाले आहे. मागणी कमी प्रमाणात मंजूर झाल्याने इतर लाभार्थ्यांनी काय करायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

वेळेत पुरवठा होण्यासाठी जिल्ह्यातील २१ गोदामांमध्ये पुरेशा प्रमाणात शिधा असणे आवश्यक आहे. सोमवारपर्यंत २१ पैकी अलिबाग, पोयनाड, पेण येथील गोदामांमध्ये फक्त साखरेचा पुरवठा झाला होता, तर पेण येथे रवा




आला आहे. हा साठा अलिबाग आणि पेण तालुक्यासाठी आहे. उर्वरित १३ तालुक्यांसाठी अद्याप रवा, चणाडाळ आणि पाम तेल आलेलेच नाही. या सर्व वस्तू पॅक करून त्याचे वितरण करावे लागणार लागते. आनंदाचा शिधा एका खास पिशवीमध्ये वाटला जातो, ज्या पिशवीवर देशातील, राज्यातील प्रमुख नेत्यांचे फोटो असतात. अशा छापील पिशव्याही अद्याप आलेल्या नाहीत. जोपर्यंत छापील पिशव्या येत नाहीत, तोपर्यंत पुरवठा विभागाकडून त्याचे वितरण केले जात नाही. या सर्वातून मार्ग काढत पुरवठा विभागाला रेशन दुकानदारांपर्यंत आनंदाचा शिधा पोहोचवावा लागणार आहे. यात किती दिवस जातील, हे सांगता येत नसल्याने यंदाचा गणेशोत्सवही आनंदाच्या शिधाविना साजरा करावा लागणार का, असा प्रश्न लाभार्थी विचारू लागले आहेत.

आतापर्यंत मिळालेल्या आनंदाच्या शिधा कीटवर देशातील, राज्यातील प्रमुख लोकप्रतिनिधींचे फोटो असायचे. जोपर्यंत अशा पिशव्या छापून येत नाही, तोपर्यंत वितरण थांबवले जात असे. आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने आताचा शिधा वाटपही अशा छापील पिशव्यांमधून होईल, असा अंदाज होता; परंतु जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आताच्या पिशव्यांवर लोकप्रतिनिधींचे फोटो नसणार आहेत.

सणाच्या दिवसात किराणा मालातील आवश्यक वस्तू घरात असाव्यात, जेणेकरून अल्प उत्पन्नातील लोकांना सण आनंदात साजरा करता येईल, हा मुख्य हेतू आनंदाचा शिधा वाटपाचा होता; परंतु ही योजना सुरू झाल्यापासून कधीही वेळेत शिधा पोहोचलेला नाही. दिवाळीसारखा सण संपून गेला तरी गरिबांच्या घरात आनंदाचा शिधा पोहोचत नाही. यंदाच्या गौरी-गणपती उत्सवानिमित्त प्रत्येकी एक किलो या परिमाणात रवा, चणाडाळ, साखर व एक लिटर सोयाबीन तेल या शिधा जिन्नसांचा समावेश असलेला आनंदाचा शिधा प्रतिशिधापत्रिका एक शिधाजिन्नस वितरित करण्याचा निर्णय राज्याच्या पुरवठा विभागाने घेतला आहे. प्रती संच १०० रुपये या सवलतीच्या दराने मिळणाऱ्या या आनंदाचा शिधा संचामध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर सोयाबीन तेल या शिधा जिन्नसांचा समावेश असणार आहे. आनंदाचा शिधा संचाचे वाटप १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर या कालावधीत करण्यात येणार आहे.

> **आनंदाचा शिधा कीटमधील जिन्नस अद्याप जिल्ह्यात दाखल झालेल्या नाहीत. वाहतूक करणाऱ्या कंत्राटदारामुळे त्यास वेळ लागत आहे. यासंदर्भात राज्य शासनाला कळविण्यात आलेले आहे. कंत्राटदाराकडून आम्हीही आढावा घेत असून सर्व जिन्नस वेळेत पोहोचाव्यात, यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.**
> **- सर्जेराव सोनवणे, जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड.**



## ज्येष्ठांनी सुरक्षिततेविषयी जागरूक रहावे-उदय झावरे

**। मुरुड । वार्ताहर ।**

ज्येष्ठ नागरिक संघ हे चालतं बोलतं व्यासपीठ असते. वयोवृद्ध लोकांचे जीवन शांततामय आणि निरोगी असले पाहिजे. या वयात ताण तणाव सहन होत नाही समाज घटकांकडून आपुलकीची अपेक्षा असते. ज्येष्ठ नागरिकांनी उतारवयात सुरक्षितते विषयी जागृत रहावे असे आवाहन मुरुडचे पोलीस निरीक्षक उदय झावरे यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ नागरिक तथा मुरुड तालुका सेवा निवृत्त संघटनेचे अध्यक्ष नयन कर्णिक, उपाध्यक्ष शकील कडू, बाळकृष्ण कासार, प्रमोद मसाल, रमेश कवळे, नैनिता कर्णिक, वैशाली कासार, अनघा चौलकर, प्रा. एम. एस. जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

ज्येष्ठाशी संवाद साधताना झावरे म्हणाले की, अलिकडे संगणकाद्वारे सायबरचे गुन्हे वाढू लागले आहेत. तेंव्हा कुठल्याही अनोळखी व्यक्तीला दूरध्वनीवर संभाषण करताना कुठलीही जास्तीची माहिती देऊ नये असे सूचित केले. यावेळी बाळकृष्ण कासार यांनी शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच धुमस्टाईल दुचाकी स्वार, भाजी मार्केट मधील वाहतुक कोंडी व इतर समस्यांचा उहापोह केला. शकील कडु, नयन कार्णिक, रमेश कवळे, प्रमोद मसाल आदींनी चर्चेत सहभाग घेतला.



## रोड रोमिओंवर पोलिसांची कारवाई

**पनवेल :** पनवेल शहरातील शाळा, कॉलेज परिसरात रोड रोमिओ तसेच दुचाकी व चारचाकी वाहनातून रॅश ड्रायव्हींग करणाऱ्यांविरुद्ध आता पनवेल शहर पोलिसांनी कारवाई करण्याची मोहिम सुरू केली आहे.

गेल्या अनेक दिवसापासून शहरातील शाळा, कॉलेज परिसरात अशा रोड रोमिओंचा नाहक त्रास विद्यार्थीनींना होत होता. त्या संदर्भात अनेक तक्रारी पोलिसांकडे करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत वपोनि. नितीन ठाकरे यांनी या रोडरोमिओंविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यास सुरूवात केली असून त्या अंतर्गत अशा प्रकारे रॅश ड्रायव्हींग करणाऱ्यांविरुद्ध मोटार ॲक्ट प्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे.

## 'नेरळच्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करणार'

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ पोलीस ठाणे हद्दी मधील नेरळ बाजारपेठ भागातील वाहतूक कोंडीवर नेरळ पोलीस ठाण्याच्या शांतता कमिटीच्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. पोलीस उप अधीक्षक धुलदेव टेले यांच्या अध्यक्षतेखाली नेरळ पोलीस ठाणे हद्दीची शांतता कमिटीची सभा झाली. त्यावेळी नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे तसेच नेरळ पोलीस ठाणे हद्दी मधील अनेक गावातील ग्रामस्थ कार्यकर्ते उपस्थित होते.

त्यावेळी अंकुश दाभने, आरिफ भाईजी, आयुब टिवाले, सर्फराज नजे, ॲड. सुमित साबळे, अरविंद कटारिया, ॲड. सम्यक सदावर्ते, झोमन पालटे, सावळाराम जाधव, पुंडलिक शिनारे, नितीन कांदळगावकर, रोहिदास मोरे, गोरख शेप, संजय अभंगे, जैतू पारधी आदी उपस्थित होते. या बैठकीत बहुतेक सर्व उपस्थित यांनी नेरळ गावातील वाहतूक कोंडी बद्दल तक्रारी केल्या.त्यात शेवटी चर्चेतून नेरळ बाजारपेठ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि अंबिका नाका येथे कायमस्वरूपी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात येईल अशी माहिती दिली. पार्किंग करून ठेवलेल्या गाड्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली. गणेश उत्सव आणि ईद निमित्त अतिरिक्त पोलिस बंदोबस्त मागविण्यात आला असल्याची माहिती दिली.

## ई-रिक्षा सेवेचा लाभ द्या; पर्यटकांची मागणी

**। माथेरान । वार्ताहर ।**

पर्यटन क्रांती घडवून आणण्यासाठी ई- रिक्षा मैलाचा दगड ठरत असताना या सेवेचा लाभ अगोदर आम्हा पर्यटकांना देण्यात यावा अशी मागणी खुद्द पर्यटकांकडून केली जात आहे.



मोटार वाहनाने दस्तुरीला आल्यावर ई-रिक्षाचा रेल्वे स्टेशन पर्यंत केवळ ३५ रुपये माणसी दर आकारला जात असल्याने ह्या प्रवासासाठी पर्यटक आपल्या लहान मुलांना घेऊन रिक्षा स्टँडवर ताटकळत उभे असतात. अशावेळी स्थानिक लोक सुध्दा ई-रिक्षातून प्रवास करण्यासाठी गर्दी करत असून रिक्षा आल्या आल्या ताबडतोब रिक्षात बसण्याची घाई करत असतात. त्यामुळे ताटकळत उभे असणाऱ्या पर्यटकांचा हिरमोड होताना दिसून येत आहे.

स्थानिक लोक ज्यावेळी रिक्षा स्टँडवर येतात. त्यावेळी त्यांना सुध्दा काही वेळ थांबविण्यासाठी संबंधित कर्मचारी वर्गाने सूचित करून अगोदर पर्यटकांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. ई-रिक्षाच्या समर्थकांनी ई-रिक्षा सुरू होण्यासाठी आपल्या परीने योगदान दिले असले तरी सुद्धा घाई न करता ज्या पर्यटकांमुळे आपल्या घरातील कुटुंबाचा उदरनिर्वाह होत आहे. त्यांना सहकार्य करणे आवश्यक आहे.

पर्यटक आले तरच येथील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येईल याची जाणीव स्थानिकांनी ठेवल्यास ही सेवा सुरळीत कायमस्वरूपी चालू राहणार आहे. रिक्षा स्टँडवर स्थानिक लोकांच्या गर्दीत ज्यांनी ई-रिक्षाला विरोध दर्शविला आहे अशीच मंडळी प्रामुख्याने ह्या सेवेचा लाभ घेण्यासाठी उतावीळ असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

> **एक दिवसीय पर्यटनासाठी इथे आलो होतो. सोबत लहान लहान मुले आणि आईबाबा होते. जवळजवळ अर्ध्या तासाने आमचा ई-रिक्षासाठी नंबर आला. त्यासाठी संघटनेने योग्य नियोजन केल्यास सर्वांना या सेवेचा लाभ मिळू शकतो. गावकऱ्यांनी अगोदर येणाऱ्या पर्यटकांना प्राधान्य दिल्यास कुणालाही ताटकळत उभे राहण्याची वेळ येणार नाही.**
> **-नटेश्वर मांगले**
> **पर्यटक मुंबई**

## खड्ड्यांवर ४० महिन्यात ४० कोटींचा खर्च

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

महानगरपालिकेने रस्त्यातील खड्डे बुजवण्यासाठी ४० महिन्यात तब्बल ४० कोटी ५८ लाख ४१ हजार २५७ रुपये खर्च केल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते दीपक कोळवणकर यांनी ही माहिती दिली. हा खर्च खड्ड्यांसाठी केला आहे की ठेकेदारासाठी असा प्रश्न दीपक कोळवणकर यांनी केला आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे पडलेले आहेत. ४० कोटी खर्च करून देखील बहुतांशी रस्ते खड्ड्यातच आहेत. त्यामुळे हा खर्च पाण्यात गेला असल्याचे बोलले जात आहे. या पैशातून ठेकेदाराचे चांगभलं झालं असल्याचा आरोप



केला जात आहे. एक एप्रिल २०२१ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत पनवेल महानगरपालिकेने पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर या ठिकाणचे खड्डे बुजवण्यासाठी ४० कोटी ५८ लाख ४१ हजार २५७ रुपये खर्च केले आहेत. एक एप्रिल २०२१ ते ३१ जुलै २०२२ पर्यंत पाच कोटी ६९ लाख ३७ हजार ६०५ रुपये खड्ड्यांवर खर्च केले. तर एक ऑगस्ट २०२२ ते एक एप्रिल २०२३ पर्यंत खड्ड्यांवर १६ कोटी नऊ लाख ९६ हजार ३७३ रुपये खर्च करण्यात आले. २ एप्रिल २०२३ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत सर्वाधिक १८ कोटी १९ लाख ७ हजार २६९ रुपये खड्ड्यांवर खर्च करण्यात आले. कोट्यवधी रुपये खर्च करून देखील खड्ड्यांची परिस्थिती जैसे थे असल्याचे दिसत आहे. त्यामुळे पालिकेने नागरिकांच्या कररुपी पैशाची खड्ड्यांवर आणि ठेकेदारावर उधळण केली असल्याचे बोलले जात आहे.

पनवेल महापालिका हद्दीत खारघर, नवीन पनवेल, कामोठे, पनवेल आदी परिसरात रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. एप्रिल २०२३ ते जुलै २०२४ पर्यंत खारघरमध्ये सर्वाधिक सहा कोटी ७१ लाख ७६ हजार रुपये खड्ड्यांवर खर्च करण्यात आले. याच १५ महिन्यात पनवेलमध्ये ४ कोटी, २७ लाख, ३० हजार रुपये, नवीन पनवेलमध्ये २ कोटी ५ लाख ९६ हजार रुपये, कामोठेत २ कोटी ३७ लाख ९६ हजार रुपये तर कळंबोलीत ३ कोटी, ३६ लाख ६ हजार रुपये खड्ड्यांवर खर्च करण्यात आले. तरीदेखील येथील रस्त्यांवर खड्डेच खड्डे दिसून येत आहेत. शास्त्रोक्त पद्धतीने खड्डे बुजवले नसल्याचा आरोप केला जात आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता व्यक्ती पाहिजे. संपर्क-९७६२७७७९७५.
- व्यावसायिक गाळा भाड्याने देणे आहे कारपेट एरिया 750 Sq Foot संपर्क ९४२२५९४०३३/८३०८३२१६२६ ठिकाण - मिरची गल्ली अलिबाग.
- Tata Heritage motors pvt. Ltd. (Alibag Showroom) Vaccancy for Below mention position 1) Sales manager-1, 2) Service manager-1, 3) Team Leader-1, 4) Custmor Adviser-5. Email- hr@heritagemotors.in Contact No. 9324517224
- ऑनलाईन प्रवेश सुरु आहे. अंगणवाडी शिक्षिका, सुपरवइझर, समाजसेवक, पत्रकार इत्यादी कोर्स प्रवेश देणे सुरु आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा ९०२९२९४८३८/९५१८५६५५१६
- वरसोली, रायगड आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- चौल, रायगड मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- संकुल सहकारी गृहनिर्माण संस्था, पिंपळभाट-अलिबाग यांना सेक्युरिटीची आवश्यकता आहे. तरी इच्छुक सेक्युरिटी एजन्सीजनी कोटेशन पाठवावे. संपर्क : शरद भोईर ९०२८५७८०३०
- विकणे आहे. ६३५ SQ.ft चा १BHK Flat पोयनाड एस.टी. थांब्यापासून ५ मिनिटांच्या अंतरावर Contact 8452054720
- Office staff required for Office in Alibag Fresh graduates can come for interview Call 9923750549 Between 11 am to 6 pm
- महा-ई-सेवा/आधार केंद्राकरीता अनुभवी कॉम्प्युटर महिला ऑपरेटर पाहिजेत. इंग्रजी, मराठी टायपिंग आणि अनुभवी उमेदवारास प्राधान्य. संपर्क : श्री वरद ऑनलाईन सर्व्हिसेस. शंकर-पार्वती अपार्टमेंट समोर, शेतकरी भवन रोड, चेंढरे, अलिबाग लिव्ह अँड लायसन्स/ऑनलाईन रेंट ॲग्रीमेंट सर्व्हिस उपलब्ध. मो. ८३०८०२२६६४, (व्हाटसअॅप) ७३८५६११२९१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## सणांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे शक्तीप्रदर्शन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव काही दिवसांवर येवून ठेपला असून ईद तसेच पर्युषण पर्व आदी सण येत आहेत.त्यामुळे पोलिसांनी कायदा सुव्यवस्थेचे नियोजन केले असून नेरळ पोलिसांनी शक्तीप्रदर्शन केले.

सणांच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि सर्व धर्मियांचे सण उत्साहात पार पडले जावेत यासाठी पोलिसांकडून शांतता सभा आयोजित केल्या जात आहेत.त्याचवेळी पोलीस दलाकडे असलेल्या सर्व यंत्रणा यांची माहिती जनतेला व्हावी आणि जनता आपल्या भागातील कायदा सुव्यवस्था यांच्या दृष्टीने निर्धास्त असावी यासाठी शक्तीप्रदर्शन पोलिसांकडून करण्यात आले.

नेरळ पोलीस ठाणे येथून निघालेले हे शक्ती प्रदर्शन कल्याण कर्जत रस्त्याने नेरळ गणेश घाट येथून ग्रामपंचायत कार्यालय असे आले.तेथून कुसुमेश्वर मंदिर असे मारुती मंदिर येथून टिळक चौकातून माथेरान नेरळ रस्त्याने बाजारपेठ मार्गे हुतात्मा हिराजी पाटील चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,हुतात्मा भाई कोतवाल चौक असा डॉ बाबासाहेब आंबेडकर मार्गे टॅक्सी स्टँड येथून नेरळ खांडा गावातून पुन्हा नेरळ पोलीस ठाणे येथे पोहचले.

## पूजन साहित्य खरेदीसाठी महिलांची बाजारपेठेत गर्दी

# हरितालिका तृतीयेसाठी महिलांची तयारी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**श्रावण महिना संपताच वेध लागतात ते गणपती बाप्पाच्या आगमनाचे. यंदा सर्वांचा लाडका बाप्पा शनिवारी (ता. ७) घरोघरी विराजमान होणार आहेत. तत्पूर्वी गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी शुक्रवारी (ता. ६) हरितालिका देवीचे पूजन केले जाणार आहे. त्यामुळे पूजेच्या साहित्य खरेदीसाठी लगबग सुरू आहे.**

हरितालिकेची मूर्ती, पत्री आणि सजावटीचे साहित्य घेण्यासाठी बाजारपेठेत महिलांची गर्दी होत आहे. विविध प्रकारची फळे, फुले, दुर्वा आणि हरितालिका देवीच्या मूर्ती, सजावटीसाठी लागणारे दागिने, शोभेच्या वस्तू घेण्यात ग्राहक मग्न आहेत, तर विक्रेत्यांनी बाजारपेठेत हरितालिकेच्या आकर्षक मूर्ती आणल्या आहेत. हरितालिका देवीच्या पूजेवेळी वाळूपासून शंकराची पिंड बनवतात, मात्र हल्ली वाळू पटकन उपलब्ध होत नसल्याने विक्रेत्यांनी



वाळूची पाकिटेही विकायला सुरुवात केली आहे.

हरितालिकेची मूर्ती, पत्री, वाळू आणि पूजासाहित्य असे एकत्र पॅकेजही दुकानदारांनी २०० ते २५० रुपयांत उपलब्ध केले आहे, तर दोन देवी व शंकराची पिंड अशा वेगवेगळ्या मूर्तींची किंमत प्रति ५० ते २०० रुपये आहे, तर मूर्तींच्या दर्जा व आकार यानुसार त्याची किंमत वेगवेगळी आहे, तसेच ऑनलाइन विक्री करणाऱ्या उद्योजकांनीही हरितालिका पूजासाहित्य विक्रीसाठी उपलब्ध केले आहे. हे साहित्य घरपोच देण्याचीदेखील व्यवस्था केली आहे. .हरितालिका व्रताचे अनन्यसाधारण महत्त्व गणेशोत्सवाच्या एक दिवस आधी येणाऱ्या हरितालिका व्रताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे व्रत भाद्रपद शुद्ध तृतीयेला केले जाते. भगवान शंकर आपल्याला पती रूपाने मिळावा, यासाठी पार्वती देवीने हे व्रत केले होते. तेव्हापासून हे व्रत कुमारिकेपासून लग्न झालेल्या महिला करतात. विशेष म्हणजे हे व्रत दरवर्षी न चुकता केले जाते.

### पूजेसाठीचे साहित्य

**हरितालिकेच्या पूजेसाठी रेती, बेल पत्र, शमी पत्र, आंब्याची पाने, पांढरी फुले, वस्त्र, तसेच १६ प्रकारच्या झाडांची प्रति १६-१६ पाने अर्थात पत्री, पूजेसाठी फुले, सौभाग्याचे साहित्य त्यात बांगड्या, काजळ, कुंकू, श्रीफळ, कलश, चंदन, तूप, तेल, कापूर, साखर, दूध, मध, दही यांचा समावेश असतो.**

# ई रिक्षा चालकांचे श्रमदान

**माथेरान :** ओबडधोबड रस्त्यातून ई रिक्षाचे मार्गक्रमण करताना चालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने अखेरीस स्वयंस्फूर्तीने या चालकांनी श्रमदानातून रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पुढाकार घेतला. श्रमदानातून रस्त्याची दुरुस्ती करण्यास सुरुवात केली आहे. यावेळी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, शैलेश भोसले, मारुती कदम, दीपक डोईफोडे, किशोर सोनावले, रुपेश गायकवाड, कन्हैया खेर, विजय कदम, अनिता रांजणे, कविता बल्लाळ, सीताराम शिंदे, अक्षय वैद्य, नजीब, हर्ष शिंदे, विजय केरेकर यांसह अन्य चालक मोठ्या संख्येने या श्रमदानाच्या महत्त्वपूर्ण कामात सहभागी झाले होते. या सर्वांच्या कामाचे कौतुक करण्यात येत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, रऊफ अ. लतीफ सैय्यद, रईस अ.लतीफ सैय्यद व इर्शाद अ.लतीफ सैय्यद यांच्या मालकीची मौजे देवघर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र. ६७ क्षेत्र ०-७५-१० (हे. आर) आकार १८.०६ (रू. पैसे) अशी मिळकत विद्यमान मालकांकडून आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याबाबत वर नमूद विद्यमान मालकांनी सांगितले आहे. तरी सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या मिळकतींत विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही, कसलाही हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागहून येणारी कोणतीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख: ०३.०९.२०२४

**(अॅड. सुरेंद्र नारायण जोशी)**
अे-१०१/१११, त्रिमुर्ती प्लाझा, बीचरोड
अलिबाग, जिल्हा रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकाना या जाहीर नोटीसीव्दारे सुचित करण्यात येते की, प्रसाद दशरथ भासे व ऋतिक दशरथ भासे रा. डिकसल तालुका कर्जत जिल्हा. रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकतीचे विद्यमान मालक संजय दत्तु मोरे व इतर रा. भुतिवली ता कर्जत जि रायगड यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे मिळकतीचे वर्णन

**मौजे-भुतिवली, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ७ | २ | ०.४८.८०<br>या पैकी ०.१६.०० क्षेत्र | ७.३७ |

सदरची शेती मिळकती हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तद्‌गभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशील विकत देण्याचे ठरविले आहे तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीस फरोक्त चार्ज,लिज अटॅचमेंट लिएन,वगैरे अथवा अन्य इतर कोणतेहि प्रकारचा कायदेशिर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्रीपुराव्यासह लेखी हरकत कळावी मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दिनांक : ०३/०९/२०२४

अशिला तर्फे अॅडव्होकेट
**अॅड सुनिल बबन मेंढरे**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा. युको बॅक शेजारी कर्जत ता कर्जत जि. रायगड
८०८७३७३७९०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे आसलपाडा ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णन असलेली जमिन मिळकत माझे अशिल श्री. रोहीदास हरी रूठे व जितेंद्र सुरेश भगत यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्रीम. कल्पना अशोक लदगे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.न | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| आसलपाडा | ९/४/अ | ०.२२.८०<br>पो.ख. ०.०१.५०<br>एकुण क्षेत्र ०.२४.३० | २.०६ |

सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास त्यास निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ४/९/२०२४

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट
**अॅड. प्रेमनाथ पुंडलिक लोभी**
मु. पो. बीड बु, ता. कर्जत, जि. रायगड
८४४६२९१८१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालकांचे दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्कांबाबतचा शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | स.नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| कावीर ता.अलिबाग | २७/२ | ०-२३-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकुण ०-२३-००<br>पैकी ०-०१-०० | ०.३० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनाजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही / -

अलिबाग
दिनांक : ०३/०९/२०२४

**अॅड. अनिकेत ना. पाटील**
ऑफीस : श्रुती सारंग बिल्डींग,
ऑफीस नं.३, युनियन बँक ऑफ इंडिया समोर, अलिबाग - रायगड,

अॅड. गौरी गिरीश म्हात्रे
निशाणी क्र. ७/ड

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ /कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज क्र.१५४/२०२४

कांता नविनचंद्र शाह ... अर्जदार

**विरुध्द**

कोणीही नाही ... सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे वडील कै. हेमराज भारमल शाह यांचे दि. १८/०६/२०१२ रोजी एम/एस बेंथानी ट्रस्ट हॉस्पिटल ठाणे येथे निधन झालेले असून ठाणे महानगरपालिका, ठाणे येथे त्यांच्या मृत्यूची नोंद केलेली आहे. तसेच अर्जदार क्र.६ यांचे पती कै. नविनचंद्र हेमराज शाह यांचे दि. १३/११/२००७ रोजी मॉडर्न नर्सिंग होम अलिबाग येथे निधन झालेले असून अलिबाग नगरपरिषद येथे त्यांच्या मृत्यूची नोंद केलेली आहे.

कै. हेमराज भारमल शाह यांना अर्जदार क्र.१. अमृतलाल हेमराज निसर (शाह), २ श्रीमती. देवकाबाई हेमराज शाह, ३. मंजुळा धिरज कारिया, ४.जयश्री प्रविण शाह, ५. प्रभाबेन किशोर छेडा, ६/१.कांता नविनचंद्र शाह, ६/२. हार्दिक नविनचंद्र शाह, ६/३ हिना कुणाल बोवा, ६/४.किंजल हरिकेश गाला हे यांचे कायदेशीर वारस आहेत. असा वारस दाखला मा. न्यायालयाकडून मिळण्याकामी सदरचा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि खालील वारसदाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास त्यांनी तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत किंवा ०४/१०/२०२४ रोजी पर्यंत या मा. न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

सही/-
**अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग - रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविणेत येते की, शिल्पा गणपत वळवला. सुधागड जि. रायगड यांनी या कार्यालयात स्वता:च्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर अर्जात त्यांनी प्रतिज्ञापत्राव्दारे त्यांचा जन्म दि. २८ जून १९८६ रोजी मौजे, महागाव ता. सुधागड . जि. रायगड येथे झाला आहे परंतु त्याची नोंद अद्यापर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे नमुद केले आहे

सदरहू शिल्पा गणपत कांबळे यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसव्दारे प्रसिध्द करणेत येत आहे.

सदर नोटीस पेपर नोटीस प्रसिद्धीकरीता माझ्या सही व शिक्कानिशी दिली आहे.

ठिकाण:- सुधागड पाली
दिनांक :- १३/०८/२०२४

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे कोळगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या गवत पड मिळकतीचे विद्यमान मालक करुणा अभिजीत राजन, रा. मुंबई यांच्या खुद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कोळगांव ता. अलिबाग | २५४/६ | -<br>पो.ख<br>एकूण | १-९९-७५<br>०-२०-००<br>२-१९-७५ | १२.०४ |

वर नमूद मिळकतीपैकी १-१९-७५ हे. आर., पो.ख. ०-२०-०० हे.आर., आकार रु.७.२२ यापैकी करुणा अभिजीत राजन यांच्या मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-५०-०० हे. आर.मिळकती संदर्भात

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ४/०९/२०२४

सही/-
**अॅड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

निरि नोंदणी
जावक क्रमांक/२०७९/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरू
इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड,
दि.३/९/२०२४ रायगड

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन.क्रमांक : RGD/13429/18/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक : ३५२/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक खांदा कॉलनी कालीबाडी ट्रस्ट पनवेल बाबत
न्यासाचा पत्ता : मु.सदनिका क्र.ए २०२, श्री.निकेतन प्लॉट क्र.१२, सेक्टर १, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, पनवेल रायगड, पनवेल, रायगड, पनवेल, पनवेल,
अर्जदार -कमळ भट्टचार्जी,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादायक आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | CASH | 7007.00 |

(अ)जंगम मिळक : रोख रू. ७००७/- मात्र
(अक्षरी रूपये सात हजार सात मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब)स्थावर मिळकत : रोख रू. /- मात्र
(अक्षरी रूपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावायाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०३/०९/२०२४ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक (प्र)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सदानंद गोविंद भोईर, रा. चौल बिबी, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे स्नेही श्री. महेश भालचंद्र कवळे, रा. तुलाडदेवी, चौल, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | जु.स.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| देवघर ता. अलिबाग | ३७९/२ | <br>पो.ख.<br>एकूण | ०-२०-००<br>०-०५-००<br>०-२५-०० | ४.३० |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०९/२०२४

सही/-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा (धाकलीवाडी), पो.चौल
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-वडवली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न. | हि.न | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| जितेंद्र सोनु भासे<br>मधुकर भाऊ थोरवे | ८ | ७ | ००-२१-००<br>पो.ख ००-००-५०<br>एकूण-००-२१-५० हे.आर.प्रति | ००-५९ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताव्दारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत,लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. ०३/०९/२०२४

सही /-
**अॅड सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्तानारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.नं. ९८८११३२२४८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे इंद्रपै, ता. अलिबाग जि. रायगड येथील गट नं. १०/१, क्षेत्र ०- १६-५० हे. आर., पो. ख. ०-०२-३० हे. आर. एकुण क्षेत्र ०-१८-८० हे. आर., आकार ३.४३ रू.पैसे, ही मिळकत, सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक गणेश कृष्णा भगत रा. मु. पो. सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरहू मिळकत आमच्या अशीलांनी खरेदी करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
तारीख : ०३/०९/२०२४

**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## पाली नगरपंचायत, पाली

स्थापना: ३१ डिसेंबर, २०२०
दुरध्वनी क्र. ०२१४२-२४२२४३
मु.पो. पाली, ता. सुधागड, जिल्हा - रायगड पिनकोड - ४१० २०५.
ई मेल आय डी - palinagarpanchayat2021@gmail.com

जा.क्र./ई-निविदा/८३७/२०२४ — दिनांक ०३/०९/२०२४

### ई- निविदा सूचना

मुख्याधिकारी, पाली नगरपंचायत पाली, ता. सुधागड, जि. रायगड पाली नगरपंचायत हद्दीतील विकासकामांसाठी द्वीलिफाफा पद्धतीने ई- निविदा सूचना प्रसिद्धी करणेबाबत. दि. ०४/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन www.mahatenders.gov.in या संकेतस्थलावर प्रसिद्धी होईल. निविदा धारकांना www.mahatenders.gov.in या संकेतस्थलावर उपलब्ध आहे.

सही/-
**मुख्याधिकारी**
**पाली नगरपंचायत पाली**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती रत्नमाला पांडुरंग मानकर २) श्री. राजेश पांडुरंग मानकर ३) श्री. विकास पांडुरंग मानकर ४) प्रमोद पांडुरंग मानकर यांचे कडुन खाली वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी सुध्दा त्यांच्याबरोबर केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| बामणगाव ता. अलिबाग, जि. रायगड | ३३ | ०-५६-६०<br>पो.ख ०-२०-५०<br>एकुण ०-७७-१० | १३.२५ |

वर नमुद केलेल्या मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी उत्तरेकडील ०-५०-०० हे. आर. पॉ एवढे क्षेत्र या पावतीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकतींबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार याचेकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात सात दिवसाच्या मध्ये दाखल कराव्यांत, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजुन इतर कोणाचाही कायदेशिर हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहेत, असे समजून व कायदेशिर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या द्वारे नोंद घ्यावी. तसेच सदरहु क्षेत्राबाबत हरकत असल्यास तसा दस्त हरकतीसोबत पाठविण्यात यावा.

अलिबाग
दिनांक : ०४/०९/२०२४

**अॅड. निकेत रा. चवरकर**
पत्ता : त्रिवेणी कॉम्प्लेक्स् रूम नं. ८
रोहिदास नगर रोड चेंढरे ता. अलिबाग
जि. रायगड. मो. नं ९०४९४९२३८०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे भायमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क. व उपविभाग क. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे.) |
|---|---|---|---|
| भायमळा, ता. अलिबाग | ७१ | क्षेत्र ०-९९-७०<br>पो. ख. ०-१५-७०<br>एकूण १-१५-४० | १७.५७ |

टिप : वरील मिळकतीपैकी रंगनाथ दत्तात्रेय पाटील, योगेश दत्तात्रेय पाटील, रतन वसंत गोडेकर,तन्वी सुनिल वार्डे, आदित्य सुनिल वार्डे यांच्या मालकीचे क्षेत्र ०-७०-४० हे. आर. एवढे क्षेत्र हे या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करत ील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधन कारक राहणार नाही.

कळावे.

अलिबाग,
तारीख : ०३/०९/२०२४

सही/-
**अॅड. सचिन दिनकर पाटील**
बी.ए.एल.एल.बी मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट व त्यावरील बंगलो मिळकत तिचे मालक श्रीविद्या कमलाकर नाईक व सायली कमलाकर नाईक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

मौजे - नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट व त्यावरील बंगलो मिळकत

| स.नं./हि.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ७७ | १४ | ४.५०.०० आर चौ. मी.(४५०-००चौ.मी.) व यावरील आर.सी.सी.बंगलो तळ मजला व पहिला मजला एकुण क्षेत्र ९५.५१ चौ मी बिल्टअप, ग्रां.प. बंगलो मिळकत नंबर ९३८ | ४५-०० |

या बिनशेती प्लॉट व त्यावरील बंगलो मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील बिनशेती प्लॉट व त्यावरील बंगलो मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०४/०९/२०२४
मोबा. ९८२२६९११०९

**अॅड. निलेश कान्हु मोरे**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक सविता उर्फ अर्चना किशोर नलावडे, रा. कोलाथरेवाडी, पो. दहिगाव, ता. सुधागड तर्फे अखत्यारी श्री. नितेश नारायण दळवी, रा. परळी, ता. सुधागड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - भेलिव, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ३ | ०-०८-१० | ०.६९ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०४/०९/२०२४

सही /-
**अॅड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे बामणसुरे, ता. अलिबाग, गट नं. १०३, क्षेत्र ०-४०-८० हे.आर., पो. ख. ०-०४-०० हे.आर., एकुण क्षेत्र ०-४४-८० हे. आर., आकार १०.८७ रु. पै., या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-४० हे. आर, पो. ख. ०-०२-०० हे. आर. एकुण क्षेत्र ०-२२-४० हे.आर., आकार ५.४४ रू. पैसे. या मिळकतीपैकी ललिता सदानंद काठे यांचे १/३ अविभक्त हिश्याचे क्षेत्र ही मिळकत, सदरहू मिळकतीच्या मालक ललिता सदानंद काठे रा. मु. बामणसुरे, पो. चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरहू मिळकत आमच्या अशीलांनी खरेदी करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०३/०९/२०२४

**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

निवडक

## भाग्यश्रीचे पदक हुकले

**पॅरिस :** भारतीय खेळाडूंनी पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत आत्तापर्यंत चांगली कामगिरी करता आली आहे. मंगळवारी महाराष्ट्राची भाग्यश्री जाधवही महिला गोळाफेक एफ ३४ प्रकरात सहभागी झाली होती. मंगळवारी ती या प्रकारातील अंतिम फेरी खेळली. मात्र, तिचे पदक अगदीच थोड्या फरकाने हुकले आहे. भाग्यश्री या स्पर्धेत पाचव्या क्रमांकावर राहिली. भाग्यश्रीने सर्वोत्तम ७.२८ मीटर लांब गोळा फेकला. या स्पर्धेत अव्वल क्रमांकावर राहिलेल्या चीनच्या लिजुआनने ९.१४ मीटर लांब गोळा फेकत सुवर्णपदक पटकावले आहे.

## शाह यांचे टेंशन वाढणार

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शाह हे डिसेंबर महिन्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या प्रमुखपदाची सूत्रे हाती घेणार आहेत. पण, हा पदभार स्वीकारताच शाह यांचे टेंशन वाढणार असल्याचे चित्र आहे. शाह यांच्या नेतृत्वाखाली आयसीसीची पहिलीच स्पर्धा पाकिस्तानमध्ये नियोजित आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेसाठी भारतीय संघाला तिथे जाण्यास तयार करण्याची जबाबदारी शाह यांच्यांवर असणार आहे आणि त्यासाठी त्यांना देशाचे गृहमंत्री अमित शाह यांचे मन वळवण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.

## रोहित शर्मा अप्रतिम खेळाडू

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा त्याच्या गमतीशीर वागणुकीसाठी ओळखला जातो. पण क्रिकेटच्या मैदानावर अचूक निर्णय घेण्यात रोहित शर्माचा कोणीही हात धरू शकत नाही. दरम्यान, भारतीय पंच अनिल चौधरी यांनी रोहितबाबत मोठे वक्तव्य केले आहे. ते म्हणाले की, रोहित दिसतो तसा नाही, तो खूप हुशार आहे. त्याचा बॉल सेन्स अप्रतिम आहे. रोहितविरुद्ध पंचगिरी करणे हे खूप सोपे काम आहे. रोहित तुम्हाला खूपच कॅज्युअल वाटतो, पण तो एक हुशार खेळाडू आहे.

## साईनाचे निवृत्तीचे संकेत

**नवी दिल्ली :** गेले अनेक महिने बॅडमिंटन कोर्टपासून दूर असलेल्या साईना नेहवालने आपल्याला संधीवात झाल्याचे उघड केले आहे, त्यामुळे वर्षाअखेरीस आपण आपल्या भवितव्याबाबत निर्णय घेऊ, असे स्पष्ट केले. या आजारामुळे आपण नेहमीचा सराव करू शकत नसल्याचेही तिने म्हटले आहे. माझा गुडघाही सक्षम राहिलेला नाही. त्यातच संधीवाताचा त्रास होत आहे. हाडांमधील कूर्चही कमकुवत झाली आहे. त्यामुळे आठ ते नऊ तासांचा सराव मी करू शकत नाही, असे साईनाने सांगितले आहे.

## ‘आरसीबीला चॅम्पियन बनवणार’

**नवी दिल्ली :** प्रियांश आर्यने अलीकडेच दिल्ली प्रीमियर लीग टी-२० दरम्यान एका षटकात सहा षटकार मारले होते. या कामगिरीमुळे त्याला नव्या सिक्सर किंगचे नाव मिळाले. त्यामुळे तो येत्या काही दिवसांत आयपीएलमध्ये खेळताना दिसू शकतो. आर्यने आयपीएलमध्ये बंगळुरूकडून खेळण्याची इच्छा व्यक्त केली. तो म्हणाला की, मला आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळायला आवडेल. तसेच, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला प्रथमच चॅम्पियन बनवण्यासाठी मी माझे १०० टक्के योगदान देईन.

# सुमीत अंतिलची ‘सुवर्ण’ फेक




**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत सोमवारी (दि.२) सुमीत अंतिलने भारताला तिसरे सुवर्णपदक जिंकून दिले आहे. त्याने पुरुषांच्या एफ६४ भालाफेक स्पर्धेत हे सुवर्णपदक जिंकले आहे. सुमीतचे हे पॅरालिम्पिकमधील दुसरे सुवर्णपदक आहे. त्याने याआधी टोकियो पॅरालिम्पिकमध्येही सुवर्णपदक जिंकले होते.

याआधी नीरज चोप्राला सलग दोन ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदक जिंकता आली नाहीत याची खंत भारतीयांमध्ये होती. पण सुमीतने सलग दोन पॅरालिम्पिक स्पर्धेत सुवर्ण जिंकून आनंद साजरा करण्याची संधी भारतीयांनी दिली आहे. सोमवारी झालेल्या अंतिम फेरीत सुमीतने सुवर्णपदक जिंकण्याबरोबरच पॅरालिम्पिकमध्ये नवा विक्रमही केला आहे. त्याने ७०.५९ मीटर लांब भालाफेकत सुवर्णपदक जिंकले आहे.

त्याने यावेळी त्याचाच टोकियो पॅरालिम्पिकमधील ६८.५५ मीटर लांब भाला फेकीचा विक्रम मोडीत काढला आहे. दरम्यान, सोमवारी श्रीलंकेच्या दुलान कोडिथुवाक्कू याने ६७.०३ मीटर लांब भाला फेकत रौप्य पदक जिंकले आहे. तर, ऑस्ट्रेलियाच्या मायकल बुरियनने ६४.८९ मीटर लांब भाला फेकत कांस्य पदक जिंकले आहे.



### भारताच्या खात्यात १५ पदकांची भर

भारतासाठी पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये नेमबाज अवनी लेखरा आणि बॅडमिंटनपटू नितेश कुमार यांनी सुवर्णपदक जिंकून दिले आहे. अवनीने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग एसएच १ प्रकारात सुवर्णपदक जिंकले, तर नितेश कुमारने पुरुषांच्या एकेरी एसएल ३ प्रकारात सुवर्णपदक जिंकले. दरम्यान, आत्तापर्यंत पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या खात्यात १४ पदके जमा झाली असून यामध्ये ३ सुवर्णपदकांसह ५ रौप्य आणि ७ कांस्य पदकांचा समावेश आहे.

### दुसऱ्याच प्रयत्नात ऐतिहासीक कामगिरी

अंतिम फेरीत सुमितने पहिल्या प्रयत्नात ६९.११ मीटर लांब भाला फेकत सर्वांना चकीत केले होते. त्यानंतर त्याने दुसऱ्या प्रयत्नात त्याची कामगिरी आणखी उंचावत नवा विक्रम करत ऐतिहासीक कामगिरी केली आहे. त्याने दुसऱ्या प्रयत्नात ७०.५९ मीटर लांब भाला फेकला. हे अंतर त्याला सुवर्णपदक जिंकून देण्यासाठी पुरेसे ठरले. तिसऱ्या प्रयत्नात ६६.६६ मीटर लांब भाला फेकला होता, तर चौथा प्रयत्न अपयशी ठरला. पाचव्या प्रयत्नात त्याने ६९.०४ लांब भाला फेकला, तर अखेरच्या प्रयत्नात ६६.५७ मीटर लांब भाला फेकला.

# क्रिशिव सावंतची नेत्रदीपक कामगिरी

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

जपान कराटे असोसिएशन इंडियाच्यावतीने रायगड जिल्हा कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा रविवारी (दि.१) रोहा येथील एमडीएन इंटरनॅशनल स्कुल येथे घेण्यात आली. यामध्ये संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथिल विद्यार्थी क्रिशिव सचिन सावंत याने १२ वर्षाखालील काता कराटे या प्रकारात प्रथम, तर कुमिते कराटे या प्रकारात द्वितीय पारितोषिकाची कमाई केली आहे.


या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १० शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा ६ वर्षावरील मुले व मुली तसेच २१ वर्षावरील पुरुष व स्त्रिया यांच्यासाठी खुल्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत क्रिशिव यांनी अमर यादवच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे आणि प्राचार्य बबन पालवे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# घरात घुसून पाकचे वस्त्रहरण

**। रावलपिंडी । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशने दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत २-० असा विजय मिळवत पाकिस्तानचे वस्त्रहरण केले आहे. पहिल्या कसोटीतील पराभवानंतर यजमान पाकिस्तानचा संघ पुनरागमन करेल असे वाटले होते. पण, बांगलादेशने त्यांना डोकं वर काढण्याचीच संधी दिली नाही.



पहिल्या कसोटीत बांगलादेशने १० गडी राखून दणदणीत विजय मिळवला होता. आणि पाकिस्तानविरुद्ध हा त्यांचा पहिलाच कसोटी विजय ठरला. दुसऱ्या कसोटी सामन्यात पाकिस्तानने पहिल्या डावात २७४ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशने २६ धावांवर ६ गडी गमावले होते. परंतु, लिटन दासने १३८ धावा करून पाकिस्तानला हैराण केले. बांगलादेशने तिथून २६२ धावांपर्यंत मजल मारली. दुसऱ्या डावात पाकिस्तानची गाडी १७२ धावांवर घसरली. विजयासाठी १८५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना जाकीर हसन आणि शदमान इस्लाम यांनी ५८ धावांची सलामी दिली. कर्णधार नजमूल होसेन शांतो आणि मोमिनूल हक यांनी ५७ धावांची भागीदारी केली. बांगलादेशला १५३ धावांवर चौथा धक्का बसला. परंतु, विजयासाठी ३२ धावाच हव्या होत्या. यावेळी बांगलादेशने ६ गडी राखून दुसरी कसोटी जिंकली.

# ‘भारताचे प्रशिक्षकपद नकोच’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विरेंद्र सेहवागने २०१७ मध्ये भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी अर्ज केला होता. परंतु, क्रिकेट सल्लागार समितीने रवी शास्त्री यांची निवड केली. त्यानंतर वीरूने पुन्हा यासाठी प्रयत्न केले नाहीत. आता सेहवागनेही तो विचार सोडून दिला आहे. एकवेळ आयपीएल संघाचा कोच होईन, परंतु, भारतीय संघाचा नाही, असा पवित्रा त्याने घेतलेला दिसत आहे. सेहवाग म्हणाला की, मला प्रशिक्षकपदासाठी विचारणा झाली तर मी नक्कीच आयपीएल संघाचा विचार करेन. परंतु, भारतीय संघाचा नाही. कारण, जर मी भारतीय संघाचा प्रशिक्षक बनलो तर १५ वर्ष खेळाडू म्हणून जे रुटीन होतं ते पुन्हा सुरू होईल.



मी १५ वर्ष संघासोबत होतो, वर्षातील ८ महिने घरच्यांपासून दूर होतो. आता माझी मुलं १४ व १६ वर्षांची आहेत आणि त्यांना माझी गरज आहे. दोघंही क्रिकेट खेळतात. एक फिरकीपटू आहे, तर दुसरा सलामीचा फलंदाज आहे. मला त्यांना शिकवायचे आहे आणि त्यासाठी त्यांच्यासोबत वेळ घालवायचा आहे.

# आदित्य करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व



**। उरण । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धा चेंबूर येथे ऑगस्टमध्ये झाली होती. यामध्ये महाराष्ट्रातील अनेक पॉवरलिफ्टर सहभागी झाले होते. या स्पर्धेत आदित्य अनंत घरत याने सुवर्णपदक पटकावले होते. यामुळे आदित्यला १३ सप्टेंबर रोजी हरियाणा येथे नॅशनल पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.

आदित्यने केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल शेतकरी कामगार पक्षातर्फे पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सन्मान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, कृउबा सभापती नारायण घरत, पनवेल पं.स. सभापती काशिनाथ पाटील, शेकाप महाराष्ट्र राज्य खजिनदार अतुल म्हात्रे, शेकाप रा.जि. खजिनदार प्रितम म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू आणि शेकाप महिला आघाडी उपस्थित होते.

## भारताचे आव्हान संपुष्टात


**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

अमेरिकन ओपन टेनिस ग्रँडस्लॅममधील पुरुष दुहेरी विभागातील भारताचे आव्हान सोमवारी (दि.२) संपुष्टात आले आहे. रोहन बोपण्णा-मॅथ्यू एब्डेन या जोडीला निराशेचा सामना करावा लागला. मॅक्सिमो गोंझालेझ व आंद्रेस मोलतेनी या अर्जेंटिनाच्या जोडीने रोहन-मॅथ्यू या जोडीवर ६-१, ७-५ अशी मात केली. रोहन-मॅथ्यू ही जोडी दुसरी मानांकित होती. मॅक्सिमो-आंद्रेस ही जोडी १६वी मानांकित होती. त्यामुळे अमेरिकन ओपन स्पर्धेतील हा धक्कादायक निकाल ठरला आहे.

# पाकिस्तानचे अजिंक्यपदाचे स्वप्न धुळीस

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशकडून झालेल्या पराभवामुळे पाकिस्तानचे जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या अंतिम सामन्यात खेळण्याचे स्वप्न धुळीस मिळाले आहे. भारतीय संघ आघाडीवर असून दुसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचा संघ आहे. त्यामुळे अंतिम सामन्याच्या शर्यतीत हेच दोन संघ सध्या आघाडीवर आहेत. तसेच, जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम सामन्याची तारीख आंतरराष्ट्रीय क्रिकेट बोर्डाने मंगळवारी (दि.३) जाहीर केली आहे. ११ ते १५ जून २०२५ या कालावधीत लॉर्ड्स मैदानावर अंतिम सामना खेळवला जाणार आहे. या कसोटीसाठी १६ जून हा राखीव दिवस ठेवण्यात आला आहे.




जागतीक कसोटी अजिंक्यपद अंतिम सामना लॉर्ड्सवर खेळवण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे. २०२१ आणि २०२३ मधील स्पर्धेचा अंतिम सामना ओव्हलवर खेळवण्यात आला होता. आणि भारतीय संघाला हार पत्करावी लागली होती. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाने तेव्हा स्पर्धा जिंकली होती. सध्याच्या रोहित शर्माचा भारत अव्वल स्थानावर आहे आणि पाठोपाठ गतविजेता ऑस्ट्रेलियन संघ आहे. त्यामागोमाग न्यूझीलंड (तिसरा), इंग्लंड (चौथा), श्रीलंका (पाचवा), दक्षिण आफ्रिका (सहावा) आणि बांगलादेश (सातवा) आहे.

# क्रीडाजगतात पाकिस्तानची नाचक्की

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानमधून मोठी बातमी समोर येत आहे. पाकिस्तानी कुस्तीपटू अली असदवर डोपिंग प्रकरणात खेळाडू दोषी आढळल्यामुळे ४ वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. यासोबत त्याचे राष्ट्रकुल स्पर्धेत जिंकलेले कांस्यपदक देखील हिरावून घेण्यात आले आहे.



पाकिस्तान कुस्ती महासंघने पुष्टी केली की अली असदवर केवळ ४ वर्षांची बंदी घालण्यात आली नाही तर २०२२ मध्ये बर्मिंगहॅम कॉमनवेल्थ गेम्समध्ये त्याने जिंकलेले कांस्य पदक देखील काढून घेण्यात आले आहे. पाकिस्तान कुस्ती महासंघाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, इंटरनॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या तपासणीत अली असदने स्पर्धे दरम्यान कामगिरी वाढवणारी औषधे घेतल्याचे समोर आले आहे. आयटीएच्या तपासणीनंतर, या आठवड्यात असदवर ४ वर्षांची बंदी घालण्याचा आणि त्याचे राष्ट्रकुल खेळातील पदक हिसकावून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. दिलेल्या मुदतीत असदने आरोपांना उत्तर न दिल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे तपास अधिकाऱ्यांनी सांगितले.

मात्र, पाकिस्तानातील ही पहिली आणि एकमेव घटना नाही. याआधी अनेक पाकिस्तानी वेटलिफ्टर्स आणि कुस्तीपटूंना डोपिंग अयशस्वी ठरल्यानंतर अशाच प्रकारच्या बंदीचा सामना करावा लागला आहे. या वर्षी मे महिन्यात आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टिंग फेडरेशनने चार पाकिस्तानी लिफ्टर्सवर डोपिंगविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ४ वर्षांची बंदी घातली होती.

# नित्याने कांस्यपदक जिंकले

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

भारताची बॅडमिंटनपटू नित्या श्री सिवन हिने पॅरिस पॅरालिम्पिक मध्ये कास्यपदक जिंकले आहे. महिलांच्या सिंगल एसएच ६ इव्हेंटमध्ये नित्याने इंडोनेशियाच्या रिना मार्लिना हिचा पराभव केला आहे. विशेष म्हणजे रिना हिने २०२२ मध्ये जागतीक अजिंक्यपदमध्ये सुवर्ण पदक पटकवले होते.

नित्याने सुरावातीपासूनच खेळावर पकड मजबूत केली होती. स्ट्रेट गेममध्ये २१-१४ आणि २१-६ अशा फरकाने तिने पकदावर नाव कोरले आहे. विशेष म्हणजे तिने सामना जिंकण्यासाठी फक्त २३ मिनिटांचा वेळ घेतला आहे. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये नित्या श्री सिवन हिच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. ही अपेक्षा तिने सार्थ ठरवली आहे. नित्याने पहिल्या गेममध्ये २१-१४ अशी आघाडी घेतली. त्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये तिने २१-६ अशा फरकाने रिनाला पराभव दाखवला. नित्याकडे १४ कांस्यपदक गुण होते. पदक घरी घेऊन जाण्यासाठी तिला फक्त एका गुणाची आवश्यकता होती.



भारताचे पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये बॅडमिंटनमधील हे पाचवे पदक ठरले आहे. भारतीय खेळाडू पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये चांगली कामगिरी करताना दिसत आहेत.

## सनरायझर्स हैद्राबादसमोर मुंबई इंडियन्सचे आव्हान


# आफ्रिका लीगचे वेळापत्रक जाहीर

**। केप टाउन । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमिअर लीग २०२५ स्पर्धेचे वारे जोरात वाहत असताना लीगचे वेळापत्रक समोर आले आहे. गतिवेजेता सनरायझर्स ईस्टर्न केप संघ दक्षिण आफ्रिका टी-२० लीगचा सलामीचा सामना खेळणार आहे. त्यांच्यासमोर मुंबई इंडियन्स केप टाऊन संघाचे आव्हान असणार आहे. सनरायझर्स ईस्टर्न केप संघ त्यांच्या घरच्या मैदानावर म्हणजेच जॉर्ज पार्क येथे हा सामना ९ जानेवारी ला खेळवण्यात येणार आहे. एसए-२० लीगच्या तिसऱ्या पर्वाचे वेळापत्रक जाहीर झाले असून ८ फेब्रुवारी ला जोहान्सबर्गच्या वंडरर्स स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे.

मागील दोन पर्वातील उप विजेते प्रेटोरिया कॅपिटल्स आणि डर्बन सुपर जायंट्स यांच्यात दुसरा सामना होणार आहे. स्पर्धेच्या पहिल्या शनिवारी डबल हेडर मुकाबल्यात पर्ल रॉयल्स वि. सनरायझर्स आणि जोबर्ग सुपर किंग्स वि. एमआय केप टाऊन समोरासमोर असणार आहेत. ३० दिवस चालणाऱ्या या लीगमधील अव्वल चार संघ प्ले ऑफसाठी पात्र ठरणार आहेत. पहिला पात्रता सामना ४ फेब्रुवारीलाल होणार असून सुपर स्पोर्ट्स पार्क येथे बाद सामना (५ फेब्रुवारी) आणि दुसरा पात्रता सामना (६ फेब्रुवारी) या लढती होणार आहेत. तसेच, एका दिवसाच्या आरामानंतर अंतिम सामना खेळवण्यात येणार आहे.

एसए-२०च्या तिसऱ्या पर्वात न्यूझीलंडचा माजी कर्णधार केन विलियम्सन हा सुपर जायंट्सकडून खेळताना दिसणार आहे. तसेच, भारताचा माजी यष्टिरक्षक फलंदाज दिनेश कार्तिक रॉयल्सकडून खेळणार असून त्याच्या संघात इंग्लंडचा स्टार फलंदाज जो रूटही असणार आहे.




### एमआयसीटीने रिटेन केलेले खेळाडू

एमआयसीटीने अष्टपैलू खेळाडू राशीद खान याला करारबद्ध केले आहे आणि न्यूझीलंडचा ट्रेंट बोल्टही फ्रँचायझीकडून खेळणार आहे. बेन स्टोक्स, अफगाणिस्तानचा अझमतुल्लाह ओमारझाई, श्रीलंकेचा नुवान तुषारा आणि ख्रिस बेंजामिन यांनाही फ्रँचायझीने संघात कायम राखले आहे. प्री साईन स्थानिक खेळाडूंमध्ये कागिसो रबाडा, डेवॉल्ड ब्रेव्हिस, रॅसी व्हॅन डेर ड्युसेन, रायन रिकल्टन, जॉर्ज लिंडे, डेलानो पॉटगिएटर, थॉमस कबेर आणि कोनोर यांची समावेश आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)